## - प्रकरण चौथे -

### // 'पाऊस' मधील आशय व अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये //

'पाळत' या कथासंग्रहानंतर द.ता.भोसले यांच्या 'पाऊस' या कथासंग्रहाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. कथानक, व्यक्तिचित्रे, मनोविश्लेषण, जीवननाटय,जीवन दर्शन, ग्रामीण वास्तव, शीर्षक, संवाद, भाषाशैली, निवेदनपध्दती, अलंकारवैभव, प्रतीके,पॅटर्न,डाँटचे उपयोजन,आरंभ-शेवट, दोष,मूल्यविचार या मुद्यांच्या आधारे हे विवेचन करण्याचे योजिले आहे.

'पाऊस' या कथासंग्रहात सामान्यपणे भुकेच्या विविध परिणा-माचे चित्रण, शोषणाच्या नाना त-हांचे दर्शन व परिस्थितीशी टक्कर देणा-या वृत्तीचा आविष्कार ही तीन आशयसूत्रे जाणवतात. भुकेच्या विविध परिणामाचे चित्रण या आशयसूत्रात, 'पाऊस','देवपूजा,' 'जहाज','भेट' व 'अनावर' या कथांचा समावेश होतो. तर शोषणाच्या नाना त-हांचे दर्शन यामध्ये 'बाजार,' 'ढासळलेली भिंत','निवडणूक','विनवणी,' 'जन्म','सुटका','निर्णय','ऊन' व 'वाढदिवस' या कथांचा समावेश होतो. तसेच परिस्थितीशी टक्कर देणा-या वृत्तीचा आविष्कार यामध्ये 'झुंज,' 'कोसळलेली','मागणी' या कथांचा समावेश होतो.

यातील 'पाऊस' कथेत भागूचा मुलगा गणा आजारी आहे. व पावसामुळे तिला कामही मिळत नाही. तिची मुलगी काशी भीक मिळण्यासाठी प्रयत्न करते, पण ती भीकही मिळत नाही. त्यांना काम देणारा मिस्त्री, शेजारच्या बायका, त्याचे काम चाललेले आहे तिथल्या दुकानदाराचा नोकर अशी सगळीकडे ती पैशासाठी पदर पसरते, पण तिला कोणी पैसे देत नाही. गणा आजारी, त्याला चहा व बिस्कीटाचा पुडा हवा असतो. पण तोही त्याला मिळत नाही. ती रस्त्याने पावसात भिजत चाललेली असते तर एका हाँटेलातील माणूस एक भाताचे पातेले

उकिरड्यावर ओतत असतो तो भात घेऊन ती घरी येते व मुलाला खाऊ घालते. मुलाची प्रकृती अधिक गंभीर होते. दवाखान्यात आणल्यावर खराब अन्नाने मुलाला विषबाधा झाली असावी असे डॉक्टर म्हणतात. आपणच आपल्या मुलाला मारले अशी भागूची समजूत होते आणि स्वतःला दोष देत ती रडू लागते.

शोषितांची दुःखे अशी. अन्न या प्राथमिक गरजेशी संबंधित असतात. हे अगदी केवळ झोपडपट्टीतच घडते असे नाही तर देवपूजा या कथेत देखील मध्यमवर्गीयांबाबत असेच घडते; श्रीधरपंत व कावेरी या वृध्द दांपत्याची देवपूजा ही कथा आहे. मुले मोठी झाली. शहरात नोकरीला गेली; पण थकलेल्या आईबापांकडे पाहण्यास त्यांना वेळ नाही. श्रीधरपंताच्या मालकीचा जो वाडा होता तो गुणाजीने घेतला. श्रीधरपंत गुणाजीकडे देवपूजा करू लागले. त्यांच्या पत्नीच्या औषधाला गुणाजी पैसे देत असत. तेथे आल्यावर त्यांना चहा मिळे. कावेरीसाठी काही गोष्टी मिळत. त्यांच्या मनाला खूप वाईट वाटत होते. ज्या वाड्यात मुले वेचली त्याच वाड्यात जणू गोव-या वेचण्याचेच काम त्यांना आले होते. नियतीने ही परिस्थिती आणली होती. गुणाजीची पत्नी गोदावरी अगत्यशील होती. पूजा संपवून, श्रीधरपंत घरी जात असताना ती चहाचा आग्रह करते. पंत नको म्हणतात, पूजेचे पैसे वाढविण्याची विनंती करतात. गोदावरीबाई पतीला हे सांगण्याचे मान्य करतात. एक पिशवी देतात. त्यात कावेरीसाठी......जिजीसाठी चहा, साखर, दूध, तांदूळ असते. पिशवीतून दूध खाली पाझरत असते. दुःखामुळे श्रीधरपंत रडत असतात. त्या पाझरणा-या दुधाकडे त्यांचे लक्षही नसते.

शोषण हे एखाद्याच्या वाट्याला केवळ एक प्रकारचे येत नाही. ते अनेक प्रकारचे असते. 'जहाज' कथेतील जिजाईच्या वाट्याला शोषण येते. घरच्यांचा विरोध असताना दाजीबरोबर जिजाई पळून जाते व लग्न करते. त्याच्या गोड गळ्यावर ती खूष असते. पण पुढे पुढे तो चार दिवस घरी रमायचा आणि पंढरीच्या वारीला गेला की तिकडेच राहयचा. तिच्या वृध्दत्वात भूतकालीन जीवनातील अनेक गोष्टी आठवत राहतात. तिच्या नशिबी केवळ कष्टच आले होते. पाटलाच्या घरचे काम करता करता तिला भूतकाळातील या सगळ्या गोष्टी आठवत होत्या. ब-याच दिवसांनी तो इतर साधूबरोबर होता. गावाबाहेरच्या मठात आला होता. जिजाई त्याला भेटायला गेली होती. त्याने फक्त ओळखीचे हास्य केले. आपल्या डोळ्यातील अश्रू आवरून लपवत लांबवरून ती त्याला पाहत राहिली; पण रात्री अचानकपणे तो झोपटात आला आणि त्याने शरीरसुखाची मागणी केली. त्याचे मानगूट पकडून तिने त्याला ऐकविले की, एक तर संसार कर नाहीतर देवाच्या पायाजवळ बैस आणि जिजाईने त्याला हाकलून लावले होते.

काम करताना तिच्या मनाचे जहाज कोठे कोठे तरंगत होते. तिने यशोदेकडे वाटीत तेल व दोन उदबत्त्या मागितल्या. कारण देवळात कोणी बाबा आलेला होता. यशोदा मंदपणे हसते. जिजाई अजूनही दाजीची वाट पाहत आहे. एखाद्या नववधूसारखी लगबगीने वाड्याबाहेर पाहत असते. अंधुक होत जाणा-या दूरवरच्या एखाद्या जहाजासारखी पाहत राहते.

माणसाचे मन मोठे विचित्र आहे. परस्परविरोधी भावना माणसाच्या मनात एकाचवेळी नांदत असतात. याचे नाट्यपूर्ण दर्शन भेट

या कथेत घडते. एका देवळात एक स्वामी राहत असतात. पोथी सांगावी, हरिनाम घ्यावे, भक्तांनी आणलेला प्रसाद भक्षण करावा व विश्रांती घ्यावी असे त्यांचे निवांत आयुष्य होते; पण त्यांचे मन काही निवांत नव्हते. दुपारच्या वेळी ते पोथी वाचत होते त्यावेळी एक चिमणा चिमणीचे दांपत्य चिवचिवाट करीत होते. त्यांच्या प्रणयाराधनाने स्वामी गुदमरुन गेले. परमेश्वराची भक्ती का शरीराची वासना या दोहोत महत्त्वाचे कोणते याचा निर्णय लागेना. मनामध्ये फणा काढून उभा राहिलेला वासनेचा नाग हळूहळू शांत झाला. स्वामींना भूतकाळ आठवला. त्यांच्या शरीरावर कुष्ठरोगाचे चट्टे दिसू लागले त्यांना खूप दुःख झाले. त्यांची पत्नी रात्रभर रडत होती. स्वामींनी भर पावसात रात्रीचे घर सोडले. धर्मशाळा, नदीचा काठ येथे आसरा घेतला व शेवटी त्यांनी कुष्ठधामाचा निवारा शोधला. तेथे तीन वर्षे राहिले. प्रकृती ठीक झाल्यावर स्वामी बनले. हा सगळा मनातला गुंता काढून ते पोथी वाचू लागले त्यावेळी एक स्त्री हातात झाकलेले तबक घेऊन आली. त्या सुंदर स्त्रीकडे त्यांचे मन आकृष्ट झाले; पण त्यांनी प्रयत्नपूर्वक पोथीकडे आपले मन ओढून घेतले. तिने भक्तिभावाने त्यांना नमस्कार केला. त्या स्त्रीचा व स्वामींचा संवाद झाला. स्वामी पोथी वाचतात, ध्यानधारणा करतात याचे तिला वैषम्य वाटत होते. कारण ती प्रपंचात पूर्ण बुडून गेली होती. मुलांविषयी, नवऱ्याविषयी कौतुकाने ती बोलत होती. त्यांनी तिचा प्रसाद स्वीकारला. त्याच बरोबर तबकावर झाकलेली वस्त्रेही मागून घेतली. त्या वस्त्राला तिचा स्पर्श झाला होता आणि आपल्या छातीशी ते वस्त्र घट्ट धरून स्वामी विश्रांती घेत होते. आपल्याला झोप येत आहे असे लक्षात येताच स्वामी पापण्या मिटू लागले. व पापण्या मिटत असताना देवळाशेजारी असणाऱ्या

तळ्याशेजारच्या दगडी कुंडात एक कुत्रा गढूळ पाणी पिण्याचा प्रयत्न करीत होता. हे दृश्य स्वामींना दिसले.

ज्या गोष्टी हरवून गेल्या त्या परत मिळाव्यात याची माणसाला अनावर ओढ असू शकते. 'अनावर' कथेत याचे दर्शन घडते. धर्मा हा असाध गृहस्थ, धर्माचे पालन करणारा माणूस आहे. त्याचे घर ज्या ठिकाणी होते, शेतीवाडी जेथे होती तेथे धरण बांधले गेले. त्याला, त्याच्या कुटुंबाला ते गाव सोडावे लागले. पुनर्वसनाच्या गावाला ही मंडळी आली; पण धर्मा मनाने आपल्या गावीच होता, त्याच्या मनात खळबळ चालली होती. तो झोपेत असताना त्याला स्वप्न पडत होते की, आपण पाण्यात बुडतो आहोत. आपल्या मुलाला पांडाला तो हाक मारतो. स्वप्नात ओरडतो, हुंदके देवू लागतो. घामाघूम होतो. पलीकडच्या खोलीत झोपलेली त्याची पत्नी धावतच धर्माजवळ येते. स्वप्न पडले का, असे विचारते. आपल्या लुगड्याच्या टोकाने त्याचा चेहरा पुसून घेते. कशाची भीती वाटली असे विचारते. पांडाला बोलावते. धर्माच्या डोळ्यांपुढे आपले घर येते. पांडा आल्यावर तो वडिलांचे अंग चोळतो. प्रेमळपणे चौकशी करतो. धर्माला त्या मातीवर जावून एकदा लोळावे असे वाटते, आठ दहा वर्षांचा सारा चित्रपट धर्माच्या डोळ्यांपुढे उभा राहतो. धरणाची मागणी, मोर्चा, सभा, वर्तमानपत्रातले लेख सारे त्याला आठवते. धरण झाले, पुनर्वसन झाले. लोक आपापल्या उद्योगाला लागले. पाच महिन्यांपासून धर्मा माळावरच्या घरात राहत होता; पण मुळ्या तुटलेल्या रोपट्यासारखी त्याची अवस्था होती. तो आतून सुकत चालला होता. सकाळ झाली होती; पण त्याच्या मनातले विचारचक्र थांबत नव्हते. बायकोला तो जुन्या आठवणी देतो. त्याची समजूत तिला घालता येत नाही. तिथे आता फक्त पाणी असेल

आता काय बघायचे असे ती म्हणते. त्याची समजूत घालते. तिच्या बोलण्याने तो गप्प होतो. खाली मान घालून चहा संपवितो. ते गाव नव्याने वसवलेले असते. त्या गावात तो भरपूर भटकतो; पण आपले पूर्वीचे गाव त्याच्या हाताला येत नाही. एका दगडावर बसून तो राहतो. आपण्च असे अधांतरी भिरभिरत आहोत याचे उत्तर काही त्याला शोधाता येत नाही. दगडावर बसून तो माणसाचे व्यवहार पाहत होता. शेजारच्या शिरपाने त्याची चौकशी केली. थोड्या वेळाने तो झपाझप चालू लागला. तो थकला, त्याच्या तोंडाला कोरड पडली. आपल्या हातापायातले बळ संपले असे त्याला वाटले. त्याने मागे वळून पाहिले तर अस्पष्ट अशी चार घरे दिसत होती. मोठ्या जिद्दीने त्याने डोंगर पार केला. आपले घर ज्या ठिकाणी होते तिकडे हात करीत आपले घर, इथेच होते असे तो म्हणाला. अजून ते घर आपणाला दिसते आहे असेही तो म्हणाला आणि शुध्द हरपेपर्यंत मोठमोठ्याने गळा काढून रडू लागला.

सामान्यपणे शोषितांची दुःखे ही पोटाची भूक, शरीराची भूक, मनाची भूक अशी तिविध स्वरूपाची असतात. माणसाचे मन विलक्षण संवेदनाक्षम असते. जीवनात येणारा अनुभव, संकट त्याला स्वीकारावेच लागते. कधी स्वतःला अन्न मिळत नाही म्हणून दुःख वाट्याला येते. तर कधी गरीब, शोषित असल्यामुळे दुसऱ्याच्या वासनेचे शिकार व्हावे लागते. 'बाजार' कथेतील चंपाचे असेच घडते. चंपा एका मुलाची आई होती. नवरा परागंदा झालेला, तिच्या आईने तिला कोठेतरी वाढविलेले. घरात ती तिघेच. लोकांच्या शेतात मजुरीने चंपा जायची. देसायाच्या शेतात ती खुरपायला गेली. त्याने वाईट नजरेने

तिच्याकडे पाहिले· मजूरी देताना दोन रुपये अधिक मजुरी दिली· पण ती जादा मजूरी चंपा मैत्रिणीच्या सांगण्यावरून परत करत नाही· तिने देसायाच्या शेतात परत कामाला जायचे नाही असे ठरविले· एके दिवशी सरपणासाठी ओलं सुकं ती गोळा करीत होती, तर देसायाने तिचे झगट धरले· तेव्हा ती त्याच्या झगटाला कडकून चावली· तिला वाईट वाटले· आपण जगू नये असे तिला वाटले· पण जगणे भाग होते· ती एकदा बाजाराला गेली· म्हातारीचे औषध आणायचे होते· मीठ मिरची आणायची होती· मुलाला पुस्तके, गोडी शेव आणायची होती· खिन्न मनाने ती परतली· बरोबरच्या बायका अगोदरच पुढे गेल्या होत्या· अंधार पडला होता· देसाई रस्त्यातच आडवा आला· बरोबर म्हादया नावाचा नोकरही होता· देसायाला तिच्याकडून सुखाची अपेक्षा होती· देसाई चंपाशी रागाने बोलला· प्रेमाने बोलला· व शेवटी त्याने तिच्यावर अत्याचार केला· ती कशीतरी भेलकांडत घरी आली· देसायाने दिलेला गोड्या शेवेचा पुडा काढून तिचा मुलगा भाना खात होता· तिला डोळ्यांपुढे काही दिसत नव्हते· समाजात शोषण करणारे व शोषित अशा दोनच जाती असतात· शोषितांना आपले दुःखही व्यक्त करता येत नाही हेच खरे·

हे शोषण विविध पातळ्यांवर चाललेले असते· 'ढासळलेली भिंत'[१] मध्ये नोकरी न मिळाल्याने अगतिक झालेला एक युवक भेटतो· मुलाखतीला जातो, पण पार्टटाईम देखील नोकरी मिळत नाही· त्याचे भाऊ-वहिनी सगळे राबत असतात त्याचा भाऊ त्याला धीर देतो· त्याला कशातच अर्थ वाटत नाही· वहिनीने वाढलेले तो मुकाट्याने खातो. त्याला ही सगळी सर्टीफिकीटे, शिफारसपत्रे म्हणजे आपण व आपले कुटुंब यांच्यातील भिंत आहे असे वाटते· कारण ती मंडळी राबत असतात व आपण नुसते

बसून खातो. तेव्हा ही सगळी सर्टीफिकिटे फाडून टाकावीत म्हणजे आपल्यातील ही भिंत दूर होईल म्हणून तो तसे करतो व ढसाढसा रडतो.

जगात शोषणकर्ते संख्येने थोडे आहेत पण ताकदीने भारी आहेत. शोषित संख्येने खूप आहेत पण शोषण करणारांपुढे अगतिक होणारे आहेत. याचा प्रत्यय 'निवडणूक' कथेत येतो -

चांगा महार तसा कोणाच्या बाजूचा नव्हता. सुस्वभावी होता. त्यामुळे लोकांच्या विश्वासाला पात्र होता. अपक्ष म्हणून निवडणुकीत निवडून आला होता. गावात कान्होजीराव व भाऊसाहेब यांचे पिढीजात वैर होते. भाऊसाहेबांनी चांगाकडे मोर्चा वळविला. रंगा, प्रताप व अधिकराव हे त्यांचे अनुयायी बरोबर होते. त्या सगळ्यांनी चांगाला पिराच्या कट्टयाकडे नेले. रांजणे गावचा सरपंच त्याला करायचे त्यांनी ठरविले होते. चांगाने आपण या गोष्टीस तयार नाही असे सांगितले. आपण मोलमजुरी करणारे. पण शेवटी सर्वांनी त्याच्याकडून होकार घेतला. काय निर्णय घ्यावा हे त्याला कळत नव्हते. कान्होजीरावांची भेट घ्यावी असे त्याने ठरविले तर त्याला बोलवायला सर्जेराव आला होता. त्यांच्या घरी पाच पंचवीस माणसे जमली होती. कान्होजीराव अडचणीत त्याला मदत करीत होते. त्याने आपणाला सरपंचपद नको असेच सांगितले. जाताना त्यांच्या माणसाने दम दिला होता. भाऊसाहेबांनी बोलावणे पाठविले हे घरी आल्यावर त्याला कळले. तब्येत ठीक नाही असे सांगितले. त्याही व्यक्तीने दम भरला व रात्री त्याची झोपडी पेटवून दिली होती. कसातरी जीव वाचवून तो व त्याचे कुटुंबीय बाहेर पडले होते. गावातील लोक कोरड्या चौकशीला आले, पण कशाचा काही उपयोग नव्हता. दोन दिवसांपूर्वी आपण सारे भारतीय, बंधुभाव, समता ही मूल्ये मुलगा वाचत

असलेले त्याला ऐकू येत होते पण प्रत्यक्षात त्याला शोषणाचा फटकाच बसला होता.

या शोषणाचे आणखी एक रूप 'विनवणी' या कथेत पाहवयास मिळते. साहेबराव या लहान मुलाला आईच्या आजाराने दुःखी केलेले असते. आजारी आई कोरडीच भाकरी खात असे. परत येऊन पाहिले तर ती झोपलेली असे. त्याच्या वडिलांनी आईला व त्याला सोडून दिलेले असते. ही मायलेकरे कष्ट करून कसे तरी जीवन जगत असतात. त्याला वाटते की, शेजारच्या गावी आपले वडील राहतात. त्यांना जाऊन भेटावे व आईची अवस्था सांगावी. आईलाही खूप दुःख होई. आपल्या मुलाच्या वाट्याला वनवास आला आहे असे तिला वाटे. साहेबरावच्या वडिलांने घर सोडण्या-अगोदर काही आरोप केले होते. त्यांना ही बायको आवडत नव्हती. सास-याने मानपान केले नाही. घर सोडल्यावर साहेबरावचे वडील चार ते आठ दिवसांनी यायचे. पुढे तेही बंद झाले. मुलासाठी ती कष्ट करीत होती. या आजारपणात साहेबराव आईची सेवा करीत होता. माणिकराव वेद-याकडे जाऊन साहेबरावचे खुरपणाचे पैसे आणावेत असे ती म्हणते त्याचे औषध आणावे असे साहेबरावला वाटते. तो जातो. आई स्वयंपाक करते. गोपा आजीकडून साहेबराव काढा आणतो. उकळून तिला पाजतो. तेथेच विचार करीत आईजवळ झोपतो.

रविवारच्या दिवशी आईचा ताप तो पाहतो. ताप काही उतरलेला नव्हता. तो मनाशीच विचार करतो आणि आठ नऊ मैलावर असलेल्या गादेगावी जायचे ठरवितो. त्या गावी जातो. घरातल्या छोट्या स्वयंपाक घरात वडील व साहेबरावची सावत्र आई जेवत बसलेली असतात. त्याचे स्वागत होते. बाहेरच्या खोलीत तो बसतो. वडील त्याला

ओळखत नाहीत. ते आजिबाहेच्या भाषेत बोलू लागतात. शेवटी 'मी साहेबराव तुमच्याकडंच आलूंया ।' (पृ.५४) असे तो म्हणतो. हा आपला मुलगा हे त्यांना पटते.ते प्रेमाने विचारपूस करतात. आई खूप आजारी आहे. तुम्ही चला असे तो म्हणतो. ते आपल्या बायकोला जेवायला वाढण्यास सांगतात. साहेबराव जेवून आल्याचे सांगतो. बशीत दिलेला चिवडा,केळी खातो. तीही साहेबरावच्या आईची चौकशी करते.तात्याने आईला भेटायला यावे असे आग्रहाने सांगतो व घरी परततो. आई वाट पाहत होती. आईला सर्व वृत्तांत देतो. दोन तीन दिवसांनी तात्या येणार आहे हेही सांगतो. पण तात्या येत नाहीत. आईचा आजार वाढतो आहे हेही तो पाहतो. गुरूजींना बोलावतो. त्यांनाही काही निर्णय देता येत नाही. ते काळजीत असतात. साहेबराव गोपाआजीला आईकडे लक्ष ठेवण्यास सांगतो आणि पुन्हा वडिलांना घेऊन येण्यासाठी गादेगावला जातो. काकुळतीला येवून आईची परिस्थिती सांगतो. ते उद्या येण्याचे आश्वासन देतात. त्याला ते राहण्याचा आग्रह करतात; पण आईच्या ओढीने तो परत येतो. घरी येतो तर आईने या जगाचा निरोप घेतलेला असतो आणि साहेबराव केवळ आक्रोश करीत राहतो.

शोषण करणारे जे असतात त्यांच्याकडे माणुसकीचा ओलावा नसतो. जो शोषित असतो त्याचे दुःख ही मंडळी जाणू शकत नाहीत. 'जन्म' या कथेत याचे प्रत्यंतर येते. गेना हा शेतमजूर. मालकाच्या शेतावर खूप राबायचा. रात्री मालकाने पाहुण्यांबरोबर मिटींग ठरविलेली. मिटींग म्हणजे खाणेपिणे. तशात मालकाची म्हैस व्यायला आलेली. गेनाने थांबले पाहिजे असा आदेश मालक देतात;पण घरी गेनाची बायकोही अवघडलेली. परटाची म्हातारी बाळंतपण करणार असते. गेनाने कौसाला धीर दिलेला असतो; पण परटाच्या म्हातारीने गेनाने

यावेळी घरी थांबले पाहिजे असे सांगितले होते. बायकोचे दुःख त्याला बघावत नव्हते. तेवढ्यात मालक आले व दरडावून ते त्याला रानात वस्तीवर घेऊन गेले. त्याला म्हशीचे बाळंतपण निस्तरावे लागले व इकडे गेनाची बायको हे जग सोडून गेली. गेनाने एकाला जन्माला घातले खरे; पण तो स्वतः मात्र जन्मातून उठला.

थोड्यामध्ये सामान्य माणसाला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. 'सुटका' या कथेत आपल्या अवघडलेल्या पत्नीची सुटका कशी होईल या चिंतेने ग्रासलेला दामू भेटतो. तो सालगडी आहे. दिवसभर राबलेला आहे. पावसात त्याच्या अंगावरचे फाटके कपडे अधिकच दीनवाणे दिसत होते. मालकांनी पाचपंचवीस रुपये दिले तर आपल्याला, बायकोला चांगले कपडे घ्यावेत असे त्याने ठरविले होते. रात्री मालकाचा दुसरा गडी सदबा वस्तीवर येणार होता. तो काही आलेला नव्हता. मालकानेही सदा आल्याशिवाय जावू नको असे म्हटले होते. कारण मालकाची म्हैस व्यायला आलेली होती. दामूला पहिलं मूल झालं, गोरपानं होतं; पण ते दोन तीन दिवसच जगलं आणि जगाचा निरोप घेऊन गेलं. त्याला वाटत होते की देवाने एवढे मूल आपणाला द्यावे. मालकाला त्याने चार रुपये मागितले. तेव्हा मालकाने एक रुपया दिला. आपल्या पत्नीची नीट सुटका देवाने करावी म्हणून तो प्रार्थना करीत होता. सदा काही येत नव्हता. त्याने अवघडलेल्या म्हशीसमोर दोन वैरणीच्या पेंढ्या टाकल्या. इतर जनावरांची वैरण सारखी केली. त्याच्या मनाची उलघाल होत होती. चाकरी महत्त्वाची की संसार महत्त्वाचा असे त्याला वाटत होते. शेवटी तो घरी आला तर घरी शेजारची म्हातारी होती. तिने दामूला धीर धरण्यास सांगितले. संगमावरच्या गोपा पवारणीला बोलावून आण असे म्हातारी म्हणाली, तर म्हातारी पंचमीलाच मुलीकडे गेली होती. मग

त्यांनीच सुचविले की रसाळाच्या भामाला आण. तो घरी आला. म्हातारीने त्याला घरीच थांबण्यास सांगितले. दुस-या कुणाला तरी ती पाठवणार होती. दामूची अवस्था केविलवाणी झाली होती. तर सदा व मालक हातात कंदील घेऊन आले होते. मालकाने काहीतरी माणुसकी दाखविली असे दामूला वाटले. त्यांच्याकडून पंचवीस,तीस रुपये मागून घ्यावे,बैलगाडी घ्यावी आणि सदाला बरोबर घेऊन पंढरपूरचा दवाखाना गाठावा आणि रखमाची सुटका करावी.

मालकांनी मात्र त्याच्यावर आल्या आल्या राग काढला.वस्तीवर जाण्याचे फर्मावले. त्याच्या बायकोकडे पाहण्यास इतर बायका होत्या. त्याने मालकाची खूप समजूत काढली, पण मालक आपल्या शब्दावर ठाम होता. शेवटी दामू व सदा वस्तीवर गेले.पहाटे म्हशीने रेडकाला जन्म दिला. दामू थकला होता तर शेजारची म्हातारी धावत वस्तीवर आली होती. तिने सोबतीला आणखी एक बाई आणली होती.दामूचे मूल आईच्या पोटातच मेले होते व रखमा कशीतरी करीत होती. दामूने जमिनीवर अंग झोकून दिले. त्याला घराची वाट नकोशी झाली होती.

दारिद्र्य आणि दुर्दैव माणसाचा चोळामोळा करून टाकते. त्याला कोंडीत पकडते. जीवनाचा प्रश्न काही सुटत नाही. देवधर्माचे वेड असलेली माणसे आपल्या प्रपंचाची मात्र राखरांगोळी करतात. 'निर्णय' या कथेत असेच घडते. या कथेची नायिका जिद्दी आहे. रोजगार करते. घरी दोन मुले, सासू,नवरा देवाधर्माच्या नादी लागलेला. सासूला अपराधी वाटत असते. आपला मुलगा देव देव करतो. आपल्या सुनेला व नातीला वाईट दिवस भोगावे लागतात. आठ दहा महिन्यांनी घरी आल्यावर

शरीरसुखाची मागणी करतो. रखमाही त्याला शरण जाते. मुली भिजत असतात. दंगा करतात. आईच्या दुःखी जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. ती कष्टाने थकून जाते. तशातच चिकाटीने जगते. खूप दिवसांनी नवरा आल्यावर त्याच्याशी ती नीट वागत नाही; पण सासूच्या म्हणण्यानुसार घरात मुलगा आला तर आयुष्याचे पांग फिटतील. मुलींना भाऊ मिळेल. ती सासूचे म्हणणे ऐकते. निसर्गाने आपले काम केलेले असते. तिच्या मनात या सगळ्या विचारांचे तरंग उठलेले असतात. मुलींना ती जेवायला घालते. आपल्यासाठी व सासूसाठी ती ताट करून घेते. तेवढ्यात वरच्या आळीचा गणपा येतो. श्रीहरीची भेट झाल्याचे सांगतो. गावाकडे आलो तर येईन असे उत्तरही दिल्याचे सांगतो. ती निघून गेल्यावर जाताना आपण एका कामासाठी आल्याचे बोलतो. गणपाने आपल्या मुलीला बाळंतपणासाठी आणलेली असते. म्हातारीने व रखमानेही आपणाकडे यावे; पण घरी रखमाचेही बाळंतपण असते. जमले तर येवू असे म्हातारी म्हणते. दोघींच्याही तोंडात घास फिरत होते. जेवणाकडे त्यांचे लक्ष नव्हते. गणपाला श्रीहरीने दिलेले उत्तर दोघींना दुःखी करीत होते. रखमाने निमूटपणे आवरा-आवर केली. आपले ताट झाकून ठेवले. भूक लागली होती; पण पोटात घास ढकलावा अशी वासना नव्हती. तिला वाटले आपला नवरा प्रपंचात रमत नाही. तिने वेड्यावाकड्या झोपलेल्या मुलींना सरळ झोपवून पडल्यापडल्या ती विचार करू लागली. तिची चुळबुळ चालू होती. म्हातारीने हाक मारली. 'झोप न्हाय लागली ?' या म्हातारीच्या प्रश्नाला तिने उत्तर दिले नाही. पण थोड्या वेळाने म्हणाली की, 'मला हा संसार रेटला पाहिजे' २ मुलीला, २ तुम्हांला एक वेळ तरी चतकोर, अर्धी भाकरी घातली पाहिजे. काहीतरी औषध देवून म्हातारीने रखमाला या गर्भारपणातून मोकळे

करावे म्हणजे ती रोजगाराला जावू शकेल असे म्हणत रखमा रडत होती. म्हातारी तिच्याकडे पाहत होती.

शोषणाचे आणखी एक रूप जु या कथेत पाहयला मिळते. आपल्या देशात जो शेतमजूर असतो त्याला सतत राबावे लागते. त्याला किती राबवून घ्यावे याला कोणतेच गणित नसते. 'जु' कथेत असेच घडते. तात्याचे आयुष्य तसे दुःखमयच, पहिली बायको चार दिवसांच्या आजाराने औषधपाणी करण्यापूर्वीच गेलेली. मालकाने त्यावेळचे संकट वारले. मग त्यांनीच एक बाई बघून लग्न करून दिलेले. बायको स्वभावाने बरी निघालेली. घरात दोन मुले खेळू लागली. मग अधिकच राबावे लागले. तात्यास गुराढोराची उस्तवारी जशी करावी लागत होती तशीच मालकिणीने सांगितलेली घरातील कामेही करावी लागत होती. मालकिणीने पाण्याच्या चार खेपा आणायला सांगितल्या. तेही काम त्याने पूर्ण केले. तेवढ्यात त्याचा मुलगा काशा वस्तीवर येताना त्याला दिसला: तो जळणासाठी आलेला होता. तात्याने त्याला रानात काटक्या बघायला सांगितल्या. मालकाच्या मुलाला सांभाळण्याचे काम त्याच्याकडे आले होते. तेवढ्यात मालकिणीने लाकडे फोडायला सांगितले. ते काम पूर्ण केल्यावर तात्याच्या लक्षात आले की लाकडाच्या सरपणाच्या साली आपल्या घरी जळणासाठी न्याव्यात. पण ती साल वाळल्यावर आपण वापरणार आहोत असे मालकीण म्हणाली. मालकाच्या दावणीत एक म्हातारा बैल होता. त्या दीनवाण्या बैलासारखी आपली अवस्था आहे असे तात्याला वाटले. त्याने शेणी गोळा करून आणली होती. मुलाने काटक्या गोळा केल्या होत्या. पण मालकिणीने शेणीही मागितली. काटक्या घेऊन मी जातो असे मुलगा म्हणाला. त्याला खूप भूक लागली

होती. मालकाच्या घरातील उत्तम अन्नाने त्याची भूक वाढविली होती. त्याने फक्त त्या पदार्थांचा मनाने आस्वाद घेतला. तात्याला मुलाने पाणी मागितले. तात्याने त्याला रात्रीची शिळी भाकरी दिली. मुलाने ती आनंदाने खाल्ली. गुरूजींनी पुस्तक मागितले आहे हेही त्याने सांगितले. मालक आल्यानंतर आपण पुस्तक देवू असे तात्या म्हणाले. ते दोघेजण घरी निघाले. मालकाच्या मुलाला बिस्किटे हवी होती. तात्याच्या खांद्यावर मालकाचा मुलगा होता. त्याच्या नव्या चपला तात्याच्या हातात होत्या. मात्र काशा डोक्यावरचा काटयाचा भार सांभाळीत आपल्या वडिलांच्या हातातील नव्या चपला पाहत पुढे चालला होता.

'वाढदिवस' ही कथा शोषणाचाच आणखी एक प्रकार सादर करते. या कथेतील भागा गरीब शेतमजूर आहे. खुरपण्याचे काम करून ती आपले पोट भरत असते. तिचा मुलगा धर्मा जळणासाठी काटक्या वेचायला आलेला असतो. मालकाने त्याला पाहिलेले असते. दुस-या दिवशी त्यांच्या मुलाचा वाढदिवस असतो. त्यासाठी त्यांना लाकडे फोडून हवी असतात. मालक धर्माशी प्रेमाने बोलतात. वस्तीवरची जड कु-हाड देतात. तो काही लाकडे फोडतो; पण वयाने तो लहान. त्याला ते श्रम झेपत नाहीत. तो शिळीपाकी भाकर मागतो; पण मालक नुसतेच पाणी वाढतात. तो उद्या येईन असे म्हणतो. मालक उद्या लवकर येण्यास बजावतात. सकाळी बारकी कु-हाड देण्याचे आश्वासन देतात. तो सकाळी येऊन ती लाकडे फोडतो. आपल्या पोटाला वाढदिवसाचे काही तरी चांगले खायला मिळेल असे त्याला वाटते; पण स्वयंपाक झाल्याशिवाय ते त्याला काही वाढू शकणार नाहीत असे ते म्हणतात. त्यालाही वेळ नसतो.

राखणीची ढोरडे न्यायची असतात. दिवसभर काम करून तो संध्याकाळी घरी येतो. मालकाकडे जाण्याचा त्याचा विचार असतो. पण मालकाने सकाळी बोलावले आहे असा निरोप आई देते. तो आईचे म्हणणे ऐकतो.

दुस-या दिवशी सकाळी मोठ्या उत्साहाने तो मालकाकडे जातो तर मालक हसत सांगतात की पाहुणेच इतके आले की, त्यांना अन्न कमी पडले. ते बायकोला सांगतात की, धर्माला काहीतरी वाढ. उष्टा भात, आंबून गेलेली बटाट्याची भाजी त्याला मिळते. जिलेबीचा चुरा मिळतो. आमटी घेण्यासाठी त्याने काहीच आणले नसल्याने तो ओंजळीने पाणी पिल्यासारखी आमटी पितो. तो जे अन्न घरी घेऊन येतो ते आंबलेले असते. तरीपण ती मायलेकरे ते अन्न खातात. धर्मा ढोरडे घेऊन रानात जातो. संध्याकाळी तो तापाने फणफणत येतो. त्याला उलट्याही झालेल्या असतात. आई देवाचा धावा करते. रडू लागते. पेकाळलेला धर्मा कधी बेशुध्द पडला हे तिला कळतही नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात देशभक्ती, त्याग ही मूल्ये मालवल्यासारखी झाली. स्वार्थ, पोटापुरते पाहणे, आपल्याच जीवनाचा विचार करणे असे घडत गेले. आणीबाणीच्या कालखंडावर आधारीत अशी 'झुंज' ही कथा आहे. आणीबाणी म्हणजे स्वातंत्र्यावर गदा. नायकाचे वडील स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांना पकडून नेण्यासाठी एक पोलिस सबइन्स्पेक्टर आपल्या चार-पाच पोलिसांसह आला होता. त्यावेळी नायकाचे बाबा जेवत होते. त्यांचे जेवण अर्धेच झाले होते; पण ते हात धुवून तसेच गेले दुस-या दिवशी काही कार्यकर्ते, हितचिंतक आले; पण सगळे घाबरलेले होते. कोरडे कोरडे बोलत होते. परिस्थिती, आमच्या मर्यादा इत्यादी सांगत होते. आईला खूप दुःख झाले होते. नायक तिची समजूत घालीत होता.

एके दिवशी झडती घेण्यासाठी आलेले पोलीस सॉरी म्हणून गेले. तशात आई आजारी पडली. नायकाला नोकरीही नव्हती. पैसे मागायला गेला तर कुणीही पैसे दिले नाहीत. त्यानंतर बाबांचे मित्र असणाऱ्या सरदेसाई नावाच्या एका मोठ्या कारखान्यातील अधिकाऱ्यांकडे नायक गेला. त्यांनीही परत लावले. नायकाचे मन व्यक्त झाले होते. तेवढ्यात घरी आल्यावर नायकाला बाबांचे पत्र आल्याचे कळले. तुरुंगातला छळ, खाण्यापिण्याचे हाल, याविषयी त्यात काही असेल असे त्याला वाटले होते. पण त्या पत्रात तसे काहीच नव्हते. उलट ते तुरुंगात आनंदी होते. विविध पक्षांची मंडळी त्यांना भेटत होती; पण त्यांच्यापुढे घरच्या आठवणी (समस्या) अडचणी दिसत होत्या. त्यावर त्यांनी उपाय सुचविले. सर्वांनी एक वेळ जेवावे. नोकरी करावी. स्वातंत्र्यसैनिकाचे मानधन नाकारावे. घरातील भांडी विकावीत. ताम्रपट गहाण टाकावा. थोडक्यात वडिलांचे हे धैर्य पाहून वडिलांविषयीच्या अभिमानाने नायकाचे डोळे भरून आले. त्यांचे हे धैर्य आपणाला लाभेल का ? असा प्रश्न नायकाच्या मनात निर्माण झाला.

दारिद्र्यामुळे गरीबाला आल्या प्रसंगाला तोंड द्यावे लागते. 'कोसळलेली' या कथेतील नायिका गरीब आहे. तलावाच्या कामावर ती जाते. तिचे आईवडील गरीबच होते. लग्न करण्यास पैसे नसल्याने तिला बिजवराला दिले होते. नवऱ्याने तळहाताच्या फोडाप्रमाणे तिला जपले; पण तो आजारी पडल्यावर कामासाठी तिला घराबाहेर पडावे लागले. औषधासाठी पाटलाकडून पाचपन्नास रुपये उसने मागावेत असे ती ठरवते. कारण नवरा तीन आठवडे आजारी होता. त्याच्या पोटात काही जात नव्हते. त्याचे सारे अंग ठणकत होते. ती पाटलाकडे पैसे मागते; पण पाटील

आपलीच अडचण सांगतात. घरी आल्यावर पाटलांनी काय सांगितले ते ती नव-याला सांगते. त्याचे म्हणणे की, मला असेच मरून जावू दे. कारण आता त्या घराला आपला उपयोग नाही असे त्याला वाटते; पण ती हिंमत हारत नाही. भांडी गहाण ठेवते व नव-याला बरे करेन असे तिला वाटते. त्यांना खाऊ घालते. स्त्रीहट्टाने तिने घागर आणलेली असते. ती गहाण ठेवायची असे ती ठरवते. गावात गोदाक्का हा व्यवसाय करीत होती. ती तिच्याकडे जाते. ती घागर ठेवून घेते; पण तिच्याकडे तीस रुपयाला काही कमी पैसे असतात. ती ते पैसे घेते. आता आणखी पैसे कोठून आणणार हा तिच्यापुढे प्रश्न असतो. ती खूप विचार करते; परंतु काही मार्ग सुचत नाही. देवळात छोटयामोठ्या तीन ते चार चांदीच्या मूर्ती असतात. त्यावेळी देवळात कोणी नसते. शेवटी त्या मूर्ती घेऊन घरी येते; पण तिची सद्सद्विवेक बुध्दी तिला स्वस्थ बसू देत नाही. आपण हे पाप केले आहे असे तिला वाटते व ती रडू लागते. देवळातल्या सा-या घंटा घणाघणा वाजताहेत असे तिला वाटते आणि तिचे देहभान हरपते.

अन्नाची भूक ही माणसाला हादरवून टाकणारी असते. गरिबाला तर केवळ या भूकेशीच झुंजावे लागते. बंका पोतराजाच्या वाट्याला असेच आयुष्य येते. तो आजारी असतो. बायको कसातरी संसाराचा गाडा रेटत असते. पोटभर भाकरी न मिळाल्याने मुलगी रडत असते. त्याला वाटते की, आपणच काहीतरी केले पाहिजे. तापामुळे त्याला चहाही कडू लागतो. बायको कॉफी करते. त्याला जरा बरे वाटते तो विचार करू लागतो. आपण काहीतरी काम केले पाहिजे म्हणून पोतराजाचा पोशाख तो काढतो. कपाळावर तीन बोटाने कुंकवाचा मळवट भरतो. हातात हलगी घेतो आणि उन्हाचाच पोतराजाचा खेळ करण्यास निघतो. त्याला

कुत्री भुंकत असतात. पोटात अन्नाचा कण नसतो. त्याच्याभोवती मुले जमा होतात. तो पाणी मागतो. एका मुलाला त्याची दया येते व तो त्याला पाणी देतो. त्याला हुशारी वाटते. तो धनगराच्या दारासमोर उभा राहतो. मुले त्याची चेष्टा करतात. तो हलगी वाजवतो. पोटाला पसाभर घाला म्हणतो. एक म्हातारी त्याच्यावर खेकसते. तो पुढे बजाबा धनगराच्या अंगणात जातो. बजाबा त्याला आधी नाचायला सांगतो व नंतर धान्य देईन असे म्हणतो. तो थकला होता; पण पोटासाठी तो नाचू लागतो. नाचता नाचता तो बेशुध्द पडतो. आनंदाने नाचणारी मुले पळून गेली. बजाबा घाबरला व घरात गेला. बंकाला कशाची जाणीव नव्हती. कमरेला बांधलेले जोंधळे त्याच्या जवळच्या मातीत सांडले होते आणि दोन शेळ्या ते वेचून खाण्यासाठी अधाशीपणे त्याच्यावर तुटून पडल्या होत्या.

कथानकानंतर व्यक्तिचित्रणाचा विचार करावयाचा. ग्रामीण मराठी कथेत प्रखर वास्तववाद १९६० नंतर प्रकट झाला. व्यक्तीचित्रणा-तून या वास्तववादाचे कसे दर्शन घडते हे पुढील कथांच्या आधारे पाहवयाचे योजिले आहे. 'पाऊस' या कथेत भागू, गणा, काशी ही व्यक्तीचित्रे आहेत. यातील भागू ही गरीब विधवा आहे. दुर्दैवी आहे. मुलाच्या आजाराने दुःखी आहे. पावसाने तिचे खोपट भिजून गेलेले असते. आपल्या मुलाला काहीतरी खायला द्यावे. आजारपणात कपभर चहा द्यावा असे तिला वाटते. यासाठी ती शेजारच्या हौसाबाईकडे जाते. अनेक ठिकाणी प्रयत्न करते; परंतु कुणीही तिची वेळ भागवत नाही. आचाऱ्याने उकिरड्यावर टाकलेला मसालेभात ती उचलून आणते. त्या भाताने तरी आपल्या मुलाच्या तोंडाला चव येईल असे तिला वाटते.

पण जीव जगवणारा तो भात जीव घेणारा ठरतो आणि आपणच आपल्या मुलाच्या मरणाला कारणीभूत होतो की काय या विचाराने ती रडू लागते. या कथेतील गणा हे पात्र म्हणजे त्या खोपटाची आशा आहे. तोच त्या खोपटाचे भाग्य उजळून दाखवणार आहे. आजारपणात साधा चहाही त्याला मिळत नाही. आईनी आणलेला आंबलेला भात तो खातो आणि तो भातच त्याचे आजारपण विकोपाला नेतो. काशी ही गणाची बहीण ती देखील भीक मागून आई सांगेल त्या माणसाला उसने पैसे मागून घरावरील संकट दूर करण्याचा प्रयत्न करते. आपल्या भावाच्या प्रकृतीची तिला काळजी आहे. या कथेत मिस्त्री, दुकानदार, हौसाबाई, आचारी, डॉक्टर ही पात्रे येतात; पण ही पात्रे या खोपटावरचे दुःख कमी करू शकत नाहीत. या गरीबाच्या दुःखाकडे ती कोरड्या सहानुभूतीने पाहतात असे दिसते. 'देवपूजा' या कथेत श्रीधरपंत, कावेरी, गुणाजी व गोदावरीबाई ही पात्रे आहेत. या कथेतील श्रीधरपंत हे पराभूत जीवन जगतात. त्यांचा भूतकाळ वैभवशाली असतो; पण वर्तमानकाळात ते खूप उपेक्षित जीवन जगतात. त्यांची पत्नी आजारी असते. त्यांना आर्थिक आधार नसतो. दुःखाशी मिळते घेण्याची त्यांची वृत्ती आहे. पूजा करताना त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. मालकाने देवाची पूजा केली तर ती देवाला पोहचेल; पण मालकाचा यावर विश्वास आहे तर आपण गप्प बसले पाहिजे असे त्यांना वाटते. मुलांनी दुर्लक्ष केल्यामुळे ते प्राप्त जीवनात मिळतेजुळते घेण्याचा प्रयत्न करतात. परिस्थितीने माणूस मजबूर होतो. श्रीधरपंताचे असेच झाले आहे. मालकीणीला पूजेचे पैसे वाढविण्यास ते सांगतात. मालकिणीने दिलेले चहा, साखर, दूध, तांदूळ हे साहित्य ते स्वीकारतात आणि आपले जिणे भिका-यासारखे आहे हे लक्षात आल्यावर दुःखाने रडू लागतात.

कावेरी ही आजारी आहे ती शरणशील आहे. मुलांना बोलावू नये असे ती नव-याला सांगते. कारण त्यांचे संसार आहेत. मुलेबाळे आहेत. महागाईमुळे म्हाता-या आईवडिलांना भेटायला येणे त्याना परवडणार नाही असे ती म्हणते. आपली सेवा करण्याऐवजी नव-याने वेळेवर पूजेला जावे कारण ही पूजा एवढाच त्यांना आधार आहे. ती तशा आजारपणातही आपल्या नव-याला अप्रत्यक्षपणे आशावाद धरण्यास सांगते. या कथेतील गुणाजी हे पात्र कर्तृत्ववान आहे. त्याने कष्टाच्या जीवावर श्रीधरपंताचा वाडा मिळविला आहे. तो तृप्त आहे. समाधानी आहे, पण व्यवहारी आहे. पंतांच्या मुलांनी त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे असे गुणाजीला वाटते. तो नुसता कोरडा उपदेश करीत नाही तर पंतांच्या पत्नीला औषधास दहा रुपयाची नोट देतो. गुणाजी बेदरकारपणे जीवन जगणारा आहे. त्यांचे मनही मोठे आहे. गोदावरीबाई याही आपल्या पतीशी मिळते जुळते घेतात. श्रीमंतीचा त्यांना गर्व नाही. गोदावरीबाई जिजींच्या तब्येतीची काळजी करतात. इतरांना धीर देण्याची त्यांची वृत्ती आहे. आपल्या बोलण्याने, वागण्याने इतरांचे जीवन सुखी व्हावे अशी त्यांची प्रसन्न वृत्ती आहे. या कथेत श्रीधरपंत कावेरी यांच्या मुलांचे नुसते उल्लेख येतात. ह्या उल्लेखावरून ही मंडळी किती संवेदनाहीन आहेत हे लक्षात येते.

'जहाज' या कथेत अन्नाच्या भुकेपेक्षा शरीराची व जीवन साफल्याची भूक हीच प्रकर्षाने जाणवते. या कथेतील जिजाई, कष्टाळू आहे. दुःखी आहे. ती मुळातच बंडखोर वृत्तीची, घरच्यांचा विरोध पत्करून दाजीशी तिने लग्न केलेले; पण तिचा डाव फसतो. दाजी परमेश्वराच्या चिंतनात मग्न होतो आणि जिजाईच्या वाट्याला उपेक्षित

जीवन येते. दाजीदेखील पूर्णपणे संसारातून मुक्त होत नाही. भजनी मंडळाबरोबर तो जेव्हा गावी येतो तेव्हा तो तिच्याकडून शरीरसुखाची अपेक्षा करतो. त्यावेळी ती त्याला देवासारखे वागण्यास सांगते. तिचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण सरळ आहे. ज्या नव-याने आपल्याला दु:खी केले तो देव मार्गाला लागला. त्यात आपण विघ्न,अडथळा आणू नये असे तिला वाटते. तिच्या मनावर संस्काराची प्रभावी पकड आहे. दाजी हा गोड गळ्याचा, अभंग गाणारा वारकरी आहे. देवाच्या नादी लागून पूर्णपणे महाराज बनणे त्याला जमत नाही. त्याच्या मनातील वासनेची ओढ कमी होत नाही. मग जिजाई रागवल्यावर तो निमूटपणे निघून जातो. यशोदा ही त्या घराची मालकीण आहे. जिजाई तिच्या घरी खूप कष्ट करीत असते. यशोदाही तिच्या वयाचा मान ठेवते. तिला प्रेमाने जेवू घालते. जिजाई अचानक देवळात जाण्याचा निर्णय घेते. तेव्हा काहीशा कुतुहलाने,अचंब्याने ती तिच्याकडे पाहते व होकारही देते. यशोदा जिजाईकडे आस्थेने पाहत असते.

भुकेच्या विविध परिमाणाचे चित्रण केवळ अन्नाच्या भुकेपर्यंत सीमित राहत नाही तर ते शरीराच्या भुकेपर्यंत विस्तारत राहते.'भेट' कथेतील स्वामी हे दुर्दैवी गृहस्थ आहेत. त्यांना कुष्ठरोग झाला व त्यांचे गृहस्थपण संपते. कुष्ठधामाला राहून त्यांची प्रकृती ठीक झाली आणि ते स्वामी बनले. पोथी वाचणे, श्लोकांचे पठण करणे. देवळात जो प्रसाद मिळेल त्यावर उपजीविका करणे असे त्यांचे चालत असे. स्वामी जणू स्वत:ला फसवीत होते. जेव्हा सुंदर गृहिणी देवळात येते त्यावेळी 'प्रभू, तुझे कल्याण करो. तुझ्या सा-या मनोवासना सफल करो.'[३] असे ते म्हणतात. 'मनोकामना' याऐवजी 'मनोवासना' असा शब्द ते वापरतात. यातून त्यांची

वैराग्यात राहून प्रपंचाकडे ओढ जाणवते. तिच्या प्रसादाच्या तबकावरील वस्त्र ते मागतात. या पाठीमागे त्या वस्त्राला तिचा स्पर्श झाला होता तेव्हा ते वस्त्र आपणाकडे असावे असे अप्रत्यक्षपणे का होईना, ते स्पर्शसुख आपणाला घेता येईल असे त्यांना वाटते. त्यांनी जो स्वामीचा अवतार धारण केलेला असतो त्यामागील त्यांचे क्षुद्रत्व येथे प्रकट होते.

या कथेची नायिका एक गृहिणी आहे, ती कुटुंबवत्सल आहे. तिच्या प्रपंचात तृप्तता आहे. तिला लहानपणापासून वैराग्याची ओढ आहे. संसारात राहून जमेल तेवढी ईश्वरभक्ती ती करते. तिची लहान मुले, पती यांच्यात ती गुंतलेली आहे. आणि त्या संसारात घार काटक्या जपत जपतच तिला ईश्वरभक्ती करावयाची आहे. तसेच या कथेत स्वामींची पत्नी, या गृहिणीचा पती, मुले यांचे उल्लेख येतात. त्यांच्या स्वभावातील काही छटा (उदा.) - पत्नीने नुसतेच घाबरणे, रडणे आणि त्यातून स्वामींनी घर सोडून जावे असे सुचविणे या स्पष्ट होतात.

ही भूक केवळ शारीरिक किंवा केवळ आध्यात्मिक नसते तर कधी आपल्या मातीच्या अनावर भुकेची ओढ असते. अनावर कथेतील धर्मा धरणग्रस्त आहे. विस्थापित आहे. त्याचे पुनर्वसन झाले आहे. त्याची पत्नी, मुलगा यांनी ते स्वीकारले आहे; पण धर्मा मनाने अजून भूतकाळातच वावरतो आहे. आपले घर, शेती, झाडे सगळे पाण्याखाली गेले हे दुःख त्याच्या जिव्हारी लागले आहे. मनामध्ये ते नेणिवेच्या पातळीवर गेले आहे. त्यामुळे तर आपण पाण्यामध्ये बुडत आहोत असे स्वप्न त्याला पडते. एके दिवशी तो खूप भावनाविवश होतो, तो डोंगरावर चढून आपले घर,

जमीन पाहण्याचा प्रयत्न करतो व शेवटी दुःखाने रडू लागतो. जे हरवले ते परत मिळावे याची केवढी अनावर ओढ असू शकते हे त्याच्या व्यक्तिचित्रावरून दिसते.

या कथेतील दुसरे पात्र धर्माची पत्नी. ती लवचिक स्वभावाची आहे. समायोजन करण्याची तिची वृत्ती आहे. तिचे आपल्या पतीवर खूप प्रेम आहे. पतीला स्वप्न पडले. तो घाबरला. तेव्हा त्याला ती धीर देण्याचा प्रयत्न करते. आपल्या लुगड्याच्या टोकाने त्याचा घाम पुसते. तिला भूतकाळाच्या आठवणी येतात का, लग्नाच्या वरातीची आठवण येते का, असे प्रश्न जेव्हा धर्मा विचारतो तेव्हा या सगळ्या गोष्टी आठवतात असे प्रांजळ उत्तर ती देते. 'पण त्याचं आता काय घेवून बसलासा.'[४] असे तुसडेपणाने ती बोलते. तो हिरमुसतो. मग आपल्या मनाची कैफियत तो मांडतो. तो पुन्हा आपले घर, जमीन पाहयला आपण जाणार आहोत असे म्हणतो. तेव्हा ती त्याची समजूत काढते. तेथे आता दहा पुरुष पाणी आहे असे ती सांगते. तिचे म्हणणे धर्माला कळत होते; पण वळत नव्हते हेच खरे.

या कथेत पांडा हे एक पात्र आहे. धर्माचा हा मुलगा नव्या पिढीतला. आल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देणारा आहे. समजूतदार आहे. वडिलांच्या वागणुकीकडे तो आपुलकीने पाहतो. आपल्या परीने वडिलांना सुख देण्याचा तो प्रयत्न करीत असतो. एक कर्तव्यदक्ष मुलगा म्हणून त्याची ओळख होते. याशिवाय या कथेत शिरपा नावाचा शेतकरी धर्माला भेटतो आणि तो सहजपणे धर्माची विचारपूस करतो. ही सगळी पात्रे धर्माच्या भावविश्वाशी संबध्द आहेत. धर्माला जे अनावर दुःख झालेले आहे ते कोणाच्याच लक्षात येत नाही असेच दिसते.

या कथासंग्रहातील आणखी एक महत्त्वाचे आशयसूत्र शोषणाच्या नाना त-हांचे दर्शन हे आहे. त्यातील 'बाजार' या कथेत चंपा, तिचा मुलगा, म्हातारी, तिची मैत्रीण, मळेवाला देसाई ही पात्रे येतात. यातील चंपा दुर्दैवी आहे. लहानपणीच वडील देवाघरी गेलेले. आई कशीतरी जगलेले. एक मूल पदरात टाकून नवरा परागंदा झालेला. आणि ती मोलमजूरी करून आपल्या अब्रूला जपत जपत असते. ती ज्या मळेवाल्या देसायाच्या शेतावर मजुरीला जात होती. त्याची नजर चंपावर होती. त्याचे जादा पैसे ती मैत्रिणीच्या सांगण्यावरून घेते. एकदा ती देसायाला रागाने प्रतिकार करते. मात्र दुस-या वेळी तो डाव साधतो; पण आपल्या मुलासाठी, आईसाठी जगण्याचा ती निर्धार करते. जो शोषक असतो. त्याला कशाचीच पर्वा नसते. पण ज्याचे शोषण होते त्याला सुख कोणते व दुःख कोणते हे कळत नाही. देसायाने दिलेली गोडी शेव आपला मुलगा चवीनं खातो आहे हे बघितल्यावर हा वरील सुखदु:खाचा आव तिच्या मनात निर्माण होतो.

या कथेतील देसाई शोषक आहे. तो शीरजोर आहे. गरीबाला मजूरी देण्याची ताकद त्याच्याकडे आहे म्हणून तो पशुतुल्य वर्तन करतो. तिची विनंती, कैफियत तो काही ऐकून घेत नाही आणि चंपावर अत्याचार करतो.

धुरपा ही चंपाची मैत्रीण आहे. तिलाही चंपासारखाच अत्याचार सहन करावा लागतो. आपल्याप्रमाणेच चंपाने वागावे असे तिला वाटत असते. चंपाची आई असहाय्य आहे. आपल्या मुलीचे दुःख ती जाणते; पण काहीच करू शकत नाही. तिचा मुलगा तसा निरागस. त्याला पुस्तक सापडत नाही. पण गोडी शेव सापडते आणि त्यावरच तो खूष होतो.

ढासळलेली भिंत कथेत सुशिक्षित बेकार तरुणाची व्यथा आहे तसेच त्याची आई,भाऊ,वहिनी ही पात्रे येतात. हा सुशिक्षित बेकार तरुण पदवीधर आहे. तो अनेक ठिकाणी मुलाखती देतो; पण त्याला नोकरी मिळत नाही. प्रत्येक ठिकाणी निराशाच त्याच्या पदरी येते. या नायकाच्या मनात संघर्ष पेटला आहे. आपली आई,भाऊ,वहिनी ही सगळीच घरातील माणसे मोलमजुरी करतात व त्यांच्या श्रमाच्या पैशातून आपण नुसत्या मुलाखती देत फिरतो आहोत याचे त्याला दुःख आहे. ही पदवीची सर्टीफिकेटेच आपणाला परावलंबी बनवत आहेत तेव्हा ही सर्टीफिकेटेच तो फाडून,जाळून टाकतो व शेवटी हताश होऊन रडू लागतो. या कथेतील आई समंजस आहे. श्रध्दाळू आहे. आशावादी आहे. आज ना उद्या आपल्या मुलाला नोकरी मिळेल व घराचे पांग फिटतील असे तिला वाटते. या नायकाचा भाऊ तुकाराम हा कष्टाळू,प्रेमळ आहे. त्याचे भावावर प्रेम आहे; तो समंजस आहे. भावाला नोकरी लागण्याविषयी तो उत्सुक आहे. तोही हिंमत देतो. या नायकाची वहिनी कष्टाळू आहे. ती खूप कष्ट करते. नायकाला हिंमत द्या येते. आपल्या कुटुंबाचा प्रपंच सावरण्यासाठी ती धडपडत असते.

जे धनदांडगे असतात त्यांच्या भांडणात सामान्य माणसाचा कसा पाचोळा होतो व त्यांचे जीवन कसे उद्ध्वस्त होते हेच 'निवडणूक' या कथेतून लक्षात येते. या कथेतील चांगा हा गावातील गरीब महार आहे. बदललेल्या परिस्थितीमुळे त्याला ग्रामपंचायतीला उमेदवार म्हणून उभे राहता येते. तो निवडून येतो आणि भाऊसाहेब व कान्होजीराव यांच्या कात्रीत सापडतो. त्याला मर्यादांची जाणीव आहे. शेवटी त्याची झोपडी जाळली जाते. तो हताश होतो. धनदांडग्यांच्या इच्छेपुढे

सामान्य माणसाचे असे शोषण होते. भाऊसाहेबांच्या वृत्तीतून गरीबावर दडपण टाकण्याचे त्यांचे कौशल्य दिसून येते. ते कधी समजुतीने तर कधी धाकाने बोलून चांगाच्या मनात अस्वस्थता निर्माण करतात.

कान्होजीराव भाऊसाहेबांचे सख्खे भाऊ शोभावेत असेच आहेत. तेही दडपशाही करतात. दरडावून बोलतात. चांगाची चांगलीच कोंडी करतात. कान्होजीराव कुटील कारस्थान करतात. चांगाची बायको अनभिज्ञ आहे. त्यामुळे आपला नवरा कोठे गेला हे त्या आलेल्या माणसाला सहजपणे सांगते, आणि चांगाच्या घराला यातूनच पुढे घूड लागते. चांगाचा मित्र भैरू या सगळ्या परिस्थितीचे नेमक्या वाक्यात वर्णन करतो. 'आयला, या दोन रेड्यांच्या टकरीत आपल्या गरीबाचे हाल.'[१५] या त्याच्या वाक्यावरून चांगाचे हाल आपल्या लक्षात येतात.

कधी हे शोषण वडिलांच्या अन्यायी वागण्याने देखील दुर्दैवी स्त्रीला व तिच्या मुलाला सोसावे लागते. विनवणी कथेत याचे प्रत्यंतर येते. या कथेत साहेबराव, त्याची आई, वडील, तात्या यांची दुसरी पत्नी ही पात्रे येतात. साहेबराव समजंस आहे. शाळा शिकत शिकत तो आईच्या प्रकृतीकडेही लक्ष देतो. आई आजारी आहे. तिला चांगले औषध मिळावे म्हणून तो शेजारच्या गावी वडिलांकडे जायचे ठरवितो तो त्यांना विनंती करतो. ते ऐकतात; पण कृती करीत नाहीत. शेवटी त्याची आई त्याला सोडून जाते. त्याच्या वाट्याला केवळ दुःखच येते. साहेबरावची आई कष्टाळू आहे. जिद्दी आहे. आपल्या मुलाचे कल्याण करावे या आशेने ती जगत असते. पण शेवटी आजारपणात तिचा मृत्यू होतो. तिचे म्हणणे असे असते. ज्याने आपल्याला आयुष्यभर विचारले नाही त्याच्या पैशातून तिला औषधोपचारही नको असतात. तिचा जिद्दी स्वभावच सातत्याने लक्षात राहतो. तात्या हे या कथेतील

आणखी एक पात्र. त्यांनी घर टाकलेले असते. त्यांचे वागणे तसे विचित्रच वाटते. कारण घराण्याचा कुलदीपक साहेबराव असतो. असे असूनही ते दुसरा घरोबा करतात. आपल्या पत्नीची, मुलाची ते काहीच चौकशी करीत नाहीत; पण साहेबराव घरी आल्यावर त्यांचा पुरुषी अहंकार सुखावतो. प्रेमाने वागतात; पण तितकेच नाटकी आहेत. साहेबरावला शब्द देवूनही ते आपल्या प्रथम पत्नीच्या भेटीला जात नाहीत. त्याची सावत्र आई उंब-याच्या आत आहे. आतिथ्याचा केवळ गृहिणीधर्म ती पाळते. साहेबरावच्या वडलांवर तिची पूर्ण हुकमत आहे असे जाणवते. या कथेत साहेबरावच्या आईला औषध देणारी गोपाआजी येते ती जशी औषध देते तशी साहेबरावच्या आईच्या मृत्यूनंतर साहेबरावच्या दु:खात अगदी सहजपणे सहभागी होते.

'जन्म' या कथेत गेना, पत्नी, सदा व मालक ही पात्रे येतात. यातील गेना हा शेतमजूर आहे. काबाडकष्ट करून आपले व पत्नीचे पोट तो भरत असतो. त्याचे पत्नीवर अत्यंत प्रेम आहे. कोसाचे दिवस भरत आलेले असतात तो तिच्याजवळ थांबणार असतो. पण मालक दरडावून त्याला घेऊन जातात. गेना हा जबाबदार व प्रेमळ पती आहे. पत्नीला तो धीर देतो. परटाच्या म्हातारीला आणतो. जिवाचे रान करतो; पण तो गुलाम आहे. मालकाच्या सूचनेप्रमाणे त्याला मळ्यात जावे लागते. जनावरांच्या बाळंतपणाच्या बाबतीत तो कुशल आहे. म्हशीचे बाळंतपण तो व्यवस्थित करतो. गेनाच्या नशिबी केवळ दु:ख येते. त्याची पत्नी घाबरलेली आहे; पण तिला आपल्या पतीची काळजी आहे. त्याचे प्रेम धडपड याविषयी ती कृतज्ञ आहे. शेवटी ती हे जग सोडून जाते.

मालक हे स्वार्थी आहेत. आपल्या मजुराची पत्नी त्याला जनाव-

रापेक्षा कमी वाटते. त्याच्याकडे करुणा नाही. सहानुभूती, दया, माया नाही. या कथेत परटाची म्हातारी, सदा, तानू, आत्याचा मुलगा ही पात्रे येतात. व आपापल्या परीने गेनाचे दुःख वाटून घेण्याचा प्रयत्न करतात.

या शोषणाचे आणखी एक रूप 'सुटका' या कथेत पाहावयास मिळते. यामध्ये सख्या, गोपा म्हातारी, रखमा, मालक ही पात्रे येतात. 'जन्म' या कथेसारखाच या कथेचा विषय आहे. या कथेतील सख्या हा शेतमजूर आहे. त्याची पत्नी अवघडलेल्या अवस्थेत आहे. मालकाकडून पैसे घेऊन पंढरपूरला दवाखान्यात जावे व बायकोची सुटका करावी असे त्याला वाटते; पण तो दुर्दैवी आहे. त्याचे मूल मरते. यानंतर गोपा म्हातारी येते ती तिच्या अनुभवाप्रमाणे रखमाला वाचविण्याचा प्रयत्न करते. तिलाही मर्यादा आहेत. या कथेतील मालक हा शोषकाचा प्रतिनिधी आहे. त्याला केवळ आपला स्वार्थ दिसतो तर सख्याचा मित्र सदा हा हुकुमाचा ताबेदार आहे. परिस्थितीने ज्याचे शोषण होते अशा दबलेल्या लोकांची विलक्षण कोंडी होते. त्यांना नीट निर्णय घेता येत नाहीत. एकदा माणसाला गुलामीत जिण्याची सवय लागली की ते मन बंडखोरी करू शकत नाही आणि बंडखोरी करणे त्या मनाला परवडत नाही. हे शोषण वेगवेगळ्या प्रकारचे असते.

'निर्णय' - कथेत रखमा, म्हातारी सासू, गणपा ही पात्रे आहेत. रखमाच्या नशिबी केवळ कष्टच आले आहेत. तिचा पती कर्तृत्ववान नाही. तिचे दुर्दैव असे की तिच्या पदरात दोन मुलीच आहेत. त्यामुळे नवरा संसाराला विटलेला आहे. अज्ञान व दारिद्र्य या चक्रात ती सापडलेली आहे. दारिद्र्यात व दुर्दैवात कोणकोणत्या अनुभवांना माणसाला सामोरे जावे लागते हे लक्षात येते. रखमाचे व्यक्तिमत्व हे अंतर्मुख करणारे आहे.

या कथेतले दुसरे पात्र तिची म्हातारी सासू, परिस्थितीने चकावली आहे. आपलाच दाम खोटा हे तिला पटते. ती आशावादी आहे. घरात मुलगा आला तर आपला मुलगा श्रीहरी घरात लक्ष घालेल आणि आपल्या घराला चांगले दिवस येतील अशी आशा तिला वाटते. गणपा हे या कथेतील आणखी एक पात्र. खेड्यातले जीवन तसे एकमेकात मिसळलेले असते. गणपाला श्रीहरी भेटल्यावर त्याने दिलेले उत्तर, 'त्याचा मी विचार केला नाय. आज तरी माझा मनं' बोलता बोलता तो थांबला. मग मी विषाय काढलाच नाही. हे गणपाने कौशल्याने सांगितले. तोही नडलेला आहे. त्याची मुलगी बाळंतपणाला आलेली आहे. या दोघींनी त्याच्या घरी काम करावे ही त्याची अपेक्षा. खेड्यातील माणसे दुःख सोसत आपल्याकडे असलेल्या तुटपुंज्या साधनांनी कष्ट करतात. दुःख हलके करण्याचा प्रयत्न करतात तेच गणपाच्या व्यक्तिचित्रातून दिसते.

शेतमजूराच्या व त्याच्या मुलाच्या अबोल दुःखाचे वर्णन करणारी 'अन' ही कथा आहे. या कथेत तात्या, काशा, मालक, मालकीणबाई व धाकटे मालक एवढी पात्रे येतात. तात्या हा कष्टाळू शेतमजूर आहे. तो नमून वागतो. काटक्या वेचायला आलेल्या आपल्या मुलाला पाहून त्याचे वात्सल्य उचंबळून येते. मुलाने गोळा केलेल्या शेणी मालकीणबाई मागतात तेव्हा तो आज्ञाधारकपणे देतो. त्याला आपल्या मुलाच्या समंजसपणाचे कौतुक आहे. आपली शिळी भाकरी तो मुलाला देतो, व मालकाचे कौतुक करतो. मालकीणबाईच्या लागट बोलण्याकडे दुर्लक्ष करतो. हसून अपमान पचवितो. त्याचा मुलगा काशा हा परिस्थिती जुळवून घेणारा आहे. आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याचा तो आटोकाट प्रयत्न करतो. डोक्यावर काटक्या घोझ अनवाणी पायाने चालत असताना तात्याच्या हातातील हलणाऱ्या नवीन चपलांकडे तो त्याच भावनेने पाहत

असतो. याच कथेतील मालकीणबाई विलक्षण व्यवहारी आहेत. लाकडाचे काप, शेण्या, साली यामध्ये त्या मन दाखवतात. त्यांचे हृदय क्षुद्र आहे. परोपकारी वृत्ती ही त्यांच्यात नाहीच.

या कथेतील मालक व धाकटे मालक यांची व्यक्तिचित्रे पार्श्वभूमी-सारखी आहेत. मालकांकडून पैसे घ्यावेत व मालक ते देतील असा विश्वास तात्याला वाटतो. धाकटे मालक केवळ हट्ट करणारे आहेत.

शोषक आपला आनंद दुसऱ्याच्या दुःखावर साजरा करतो हे 'वाढदिवस' या कथेतील मालकाच्या व्यक्तिचित्रातून लक्षात येते. या कथेत मालक, धर्मा, भागी ही प्रमुख पात्रे आहेत. मालक हे धोरणाने वागणारे आहेत. गरीबाच्या मुलाचा नीट विचार करीत नाहीत. धर्माला वाढदिवसाच्या चांगल्या जेवणाची लालूच दाखवतात व त्याला न झेपणाऱ्या कुऱ्हाडीने लाकडे फोडायला लावतात. ते धोरणी आहेत. युक्तिबाज आहेत. गोड बोलून ते धर्माला झुलवत ठेवतात. आणि वाढदिवसाचे मिष्टान्न देण्याऐवजी आंबलेला भात त्याच्या पदरात बांधतात.

या कथेतील धर्मा हा शोषितांचा प्रतिनिधी आहे. चांगल्या अन्नासाठी तो कष्ट करतो. आशा वेडी असते. असे म्हणतात ते धर्माच्या बाबतीत पटते, या कथेतील तिसरे पात्र भागी आहे. ती कष्टाळू आहे. आपल्या मालकाचे ऐकले नाही तर आपल्याला काम मिळणार नाही असे तिला वाटते. त्यामुळे ती मुलाला कामावर पाठवते. आईचे प्रेम आंधळे असते तसे तिचे वागणे आहे. म्हणून ती आंबलेला भात आपल्या मुलाला देते. व मुलगा उलटयाने बेजार झाल्यावर ती देवाचा धावा करते. त्या कथेत मालकाची मुलगी, इतर पाहुणेमंडळी यांचा उल्लेख येतो, पण ही माणसे देखील संवेदना हरवलेली आहेत. जे शोषक असतात ते आपण व

आपले सुध्दा यापलीकडे जातच नाहीत असे दिसते.

परिस्थितीशी टक्कर देणाऱ्या वृत्तीचा आविष्कार या आशयसूत्रातील 'झुंज','कोसळलेली' व 'मागणी' या तीन कथा आहेत.

'झुंज' या कथेत बाबा, आई, बाबू, शेटजी, सरदेसाई ही पात्रे आहेत. या कथेतील बाबा हे स्वातंत्र्यसैनिक आहेत. जीवनातील मूल्ये जपणारे आहे. स्वातंत्र्यसैनिकाचे मानधनही आपल्या कुटुंबाने नाकारावे असे त्यांना वाटते. बाबांचे आचार व विचार यामध्ये सुसंगती आहे. त्यांचे व्यक्तिमत्व प्रेरणा देणारे आहे. या कथेतील आई श्रध्दाळू आहे. आल्या प्रसंगाला ती तोंड देते. घराची झडती घेतली जाते त्या प्रसंगाने ती दुःखी कष्टी होते. पण त्यांच्या घरात काहीच न सापडल्याने त्या कुटुंबाची शुध्दताच उजळून निघते. ती भोळी आहे. इतर लोक जी आश्वासने देत होती ती तिला खरी वाटत होती. या कथेतील गिरीधर शेटजी हे व्यवहार पाळणारे आहेत. बाबांचे बालमित्र असून देखील ते पैसेसुध्दा देत नाहीत कारण आपण पकडले जावू असे त्यांना वाटते. थोडक्यात ते कातडीबचावू गृहस्थ आहेत. सरदेसाई हे बाबांचे आणखी एक मित्र. ते देखील मोठे अधिकारी असून बाबूला काही मदत करीत नाहीत. उलट देशभक्तीची टिंगल करतात. या कथेचा नायक बाबू हा तरुण आहे. अनुभवी आहे. आणीबाणी, पोलीस, तुरुंगवास याने तो भांबावलेला आहे. जगाच्या दाहक अनुभवाने तो पोळलेला आहे. त्यातूनच हिंमतीने जगावयाचे तो ठरवितो. त्याच्याभोवतालची माणसे आहेत ती सगळी स्वार्थी, भेकड. ही माणसे त्याची विलक्षण कोंडी करतात. पण बाबांचे पत्र त्याला प्रेरणा देते. त्याच्या अंतःकरणातील झुंज देण्याची प्रवृत्ती स्फुरण पावते.

'कोसळलेली' या कथेत नायिका, तिचा नवरा, पाटील व गोदाक्का ही पात्रे येतात. यातील नायिका आपल्या नवऱ्याच्या आजाराने घाबरलेली आहे. पण ती बळ बांधून आल्या प्रसंगाला तोंड देते. पाटलाकडे जाऊन पैसे आणावेत. शहरातल्या दवाखान्यात औषधपाणी घ्यावे व आपला नवरा बरा होईल ही तिला आशा आहे. पण पाटलाकडून तिला पैसे मिळत नाहीत. नवऱ्याने अशुभ बोलल्यावर ती गलबलून जाते. जीव गहाण टाकण्याची भाषा ती बोलते. तिची आवडती घागर गोदाक्काला विकते; पण दवाखान्यात जाण्यास पैसे अपुरे पडतात. त्यानंतर ती मूर्ती चोरते; पण शेवटी तिचे मन तिला साथ देत नाही. आपण पाप केले या भावनेने ती कोसळते. तिच्या व्यक्तिचित्रातून तिची प्रपंचाची ओढ, धडपड, युक्तिवाद, तिच्यावरील संस्काराचा प्रभाव या गोष्टी स्पष्ट होतात.

तिचा नवरा दाजी प्रांजळ आहे. आपल्या पत्नीच्या कष्टाने दुःखी झाला आहे. आपण कुटुंबाला भारभूत होतो आहोत. याचे अपराधीपण त्याच्या बोलण्यातून जाणवते. या कथेतील पाटील व गोदाक्का हे व्यवहारी आहेत. शेवटी ज्याचा त्यालाच प्रश्न सोडवावा लागतो हेच त्यांच्या वागण्यावरून दिसते. या कथेत तिच्या मुलांचा, पाटलाकडे येणाऱ्या गावकऱ्यांचा नुसता उल्लेख येतो. ही पात्रे कौसाच्या भोवतालचे जीवन नेहमीसारखेच चालू आहे हेच स्पष्ट करतात.

'मागणी' या कथेत बंका त्याची पत्नी व धनगराचा बजाबा ही पात्रे येतात. यातील पत्नी नवऱ्याच्या आजाराने गडबडून गेलेली आहे. पण ती हिमतीने लढते आहे. आपण लोकांच्या उपयोगी पडलो; पण आपल्या उपयोगी कोणी पडत नाही याचे वैफल्य बोलण्यातून जाणवते. तिला कर्तव्याची जाणीव आहे. नवऱ्यासाठी ती कॉफी करून देते आणि

उरलेली मुलांनाही देते. बंका हा पोतराज आहे. आजारी पडल्यामुळे त्याला बाहेर पडता येत नाही; पण आपल्या पत्नीचे हाल त्याला पाहवत नाहीत. तो पोतराजाचा पोशाख करतो. देवीचा भक्त बनतो. आजारपणात घरोघरी जायचे ठरवितो. उन्हातून जाताना त्याला त्रास होतो. पण मुलांची चेष्टा, कुत्र्याचे भुंकणे याकडे दुर्लक्ष करतो. बजाबा धनगराचे जोंधळे घेतो व बेशुध्द पडतो. आपल्या घरासाठी काही करावे या भावनेने बंका हे सगळे करतो. त्याचा कुटुंबवत्सल स्वभावच त्याच्या वागण्यातून स्पष्ट होतो.

धनगराचा बजाबा काय किंवा इतर मुले काय. मानवी पातळीवर याचा विचारच करीत नाहीत. त्यांची संवेदना बधिर झाली आहे असेच लक्षात येते.

व्यक्तिचित्रणानंतर 'पाऊस' या कथासंग्रहातील मनोविश्लेषणाचा विचार करावयाचा. भुकेच्या विविध परिमाणांचे चित्रण या आशय-सूत्राच्या पार्श्वभूमीवर 'पाऊसमधील' 'भागू' या नायिकेच्या मनातील खळबळीचा विचार करणे अगत्याचे आहे. तिच्या खोपटात भुकेपाठोपाठ आजारपणाने प्रवेश केला आहे. आणि त्या आजारपणाने तिच्या मनाला ग्रासले आहे. दारिद्र्य, प्राथमिक गरजा पूर्ण करताना जीवाची उलघाल या वास्तवाला भागूला सामोरे जावे लागते. पण तिच्या चिंतनाला स्वप्नाचे पदर लाभलेले दिसतात. आपल्या मुलाला वाचवावे अशी परमेश्वराकडे ती प्रार्थना करते. ती विधवा आहे. तिच्या जीवनाची पडझड झालेली आहे. मुलगा हाच तिच्या म्हातारपणाचा आधार आहे. तिच्या प्रार्थनेला तिच्या दुःखाचे, रडण्याचे स्वर लाभतात. ही पात्रे जेव्हा आपल्या प्रश्नाचा, दुःखाचा विचार करतात, त्यातून हे मनोविश्लेषण आविष्कृत होते.

'देवपूजा' कथेतील 'श्रीधरपंत' आपल्याच मनाशी संवाद साधतात. मुलांच्या शिक्षणासाठी काही जमीन विकली. कुळकायद्याने कुळाला काही जमीन गेली तर जो एक जमिनीचा तुकडा उरलेला आहे त्याचे कुळ जे देईल त्यात समाधान मानायचे. मुलांचा आधार तुटलेला, पत्नीचे आजारपण यातून मनाची जी विकल अवस्था झालेली आहे ती पूर्वीच्या वैभवाच्या दिवसाच्या आठवणीने कशीतरी भरून काढायची. असे श्रीधरपंताचे चालले आहे. तर 'जहाज' कथेतील 'जिजाई' ही सतत आपल्या संसाराचा विचार करते म्हणून तर "तिला स्वयंपाकघरात बसलेली यशोदा सोन्याची पिवळी धम्मक पिंड"[७] वाटते. 'ती सजवलेली गौर'[८] वाटते. जिजाईला वास्तवाचे कितीतरी चटके बसलेले असतात आणि तिचे ओढलेले मन अ-हेवपणाकडे असे उत्कटतेने आकर्षित होते. या कथातील अनेक पात्रांना भावना दडपून जगावे लागते आणि त्यांचे मन आक्रंदत असते. 'भेट' कथेतील 'स्वामी' संन्यस्त जीवन जगत असतात. पण अचानक त्यांना पत्नीची आठवण येते. "ती अशी कुठे असेल ? काय करीत असेल ! एकटी असेल की एखाद्या तरण्या वृक्षाचा आधार घेऊन फुलली असेल ? आपली आठवण तिला येत असेल का ? आली तरी कसली येत असेल ? फसवल्याची की स्वेच्छेने जीवनाला वळविल्याचे ! कदाचित येतही नसेल. नाही तरी आपणाला कुठे तिची दरदरून आठवण येते"?[९] या परिच्छेदातील प्रश्न व उद्‌गार स्वामींच्या मनाचे नितळ दर्शन घडवितात असे दिसते. तर 'अनावर' कथेतील धर्मा आपल्या वेगळ्या भावनांनी चकावला आहे. पुनर्वसित गावात माणसे, जनावरे सारखी आहेत. घरासारखी घरे आहेत. पण आपला जीव असा अंधातरी का टांगला आहे. जुन्या घराची आपल्याला आठवण का येते आहे असे धर्माला वाटते. आपल्या मनातील आठवणी हे अनावरपणे त्याला चकीत करते असे दिसते.

शोषणाच्या नाना त-हांच्या दर्शनात शोषिताच्याच मनाची घालमेल ऐकू येते. येथे या शोषितांना वेगवेगळ्या प्रकारचा अत्याचार सोसावा लागतो. त्याची केवळ आपल्या मनापुढेच त्यांना दाद मागता येते. 'बाजार' कथेतील 'चंपावर' जेव्हा देसायांकडून अत्याचार होतो तेव्हा तिच्या वेदना हजार इंगळ्या डसल्याच्या तीव्रतेच्या असतात. आपल्या अंगाला आगीचा लोळ लपेटलेला आहे असे तिला वाटते तर 'ढासळलेली भिंत' मधील नायकाच्या मनापुढे अनेक प्रश्न निर्माण होतात. आपले अशिक्षित कुटुंबीय राबताहेयेत आणि आपणाच बांडगूळासारखे जगत आहोत. आपणच त्यांचे शोषण करीत आहोत असे नायकाला वाटते. तर 'निवडणूक' कथेतील 'चांगा' हा चांगलाच घाबरून गेलेला आहे. गावातील दोन पार्टीचे दोघे नेते त्याच्यावर दडपण आणत आहेत. त्याची किंकर्तव्यमूढ अवस्था झाली आहे. आपण सरपंचपदाच्या निवडणुकीस उभे राहवे की न राहावे याचा त्याला निर्णय घेता येत नाही तर 'विनवणी' मधील आई मुलाने त्याच्या वडिलांचे नाव घेतल्यावर चरकते. एका निग्रहाने कष्ट करीत आपल्या मुलाला वाढवायचे हे तिने निर्धारपूर्वक ठरविलेले असते, पण पतीच्या नावाच्या उल्लेखाने तिच्या मनात प्रचंड उलथापालथ होते. मुलाला हे कसे सुचले असावे याविषयी नाना प्रश्न तिच्या मनात निर्माण होतात आणि त्याची उत्तरे तिला सापडत नाहीत. ती भांबावून जाते. तर या संदर्भात प्रा. वासुदेव मुलाटे म्हणतात,

"विनवणी कथेत खेड्यातील एका संध्याकाळचे चित्रही बघण्यासारखे आहे. शकुनाच्या कल्पना सर्वत्राच आहेत. ग्रामीण माणूस त्यावर अधिक विश्वास ठेवतो. विशेषत: माणूस काळजीत असला म्हणजे मन अगतिक होऊन त्यावर अधिक विचार करत." [१०]

तर 'जन्म' कथेतील गेनाला आपल्या पत्नीच्या बाळंतपणाची

काळजी लागलेली आहे. मालकाचे उपकार एका बाजूला, तर दुस-या बाजूला पत्नीची काळजी या कात्रीत तो आहे, 'सुटका' कथेतील सख्या देखील 'जन्म' कथेतील गेनासारखाच व्याकुळ झालेला आहे. तो थोडे बंड करतो. मालकाची अवज्ञा करुन पत्नीसाठी धडपडतो. अर्थात ही बंडखोरी थोडावेळच टिकते. कारण परत त्याला मालकाची आज्ञा मानावी लागते.

'सुटका' कथेच्या नायकाची अवस्था प्रा. वासुदेव मुलाटे यांनी समर्पक शब्दात मांडली आहे. ते म्हणतात,

"'सुटका' कथेमध्ये दामूची बायको गरोदर असते. दिवस भरलेले असतात. बाळंतपण म्हणजे स्त्रीचा पुनर्जन्म म्हणूनच काळजी असते. पण मालकाच्या कामात त्याला घरी थांबता येत नाही. कशीतरी कामातून तो सुटका करुन घेतो. घराकडे यावयास निघतो. घरी परतताना कुत्र्याचे रडणे त्याच्या कानावर येते. कुत्र्याचे रडणे, अशुभ असते म्हणे. त्याच्या मनात एका क्षणात हजारो विचार आले. हे विचार शुभाशुभाबद्दलच्या संस्कारातून आलेले आहेत हे लक्षात घ्यावे लागते." [११]

या शुभाशुभाबद्दलच्या संस्काराच्याकडे जसे ते लक्ष वेधतात तसेच दामूच्या मनाची स्पंदनेही ते पुढीलप्रमाणे शब्दांकित करतात -

'निर्णय' कथेतील रखमा पतीच्या वागण्याने गोंधळून गेलेली आहे. कारण संसाराचा तिटकारा असणारा पती आपल्या पत्नीला संसारात कसा अडकवितो. आपल्याला संसाराचा वीट आलेला आहे असे जो तो म्हणतो. त्यात कितपत तथ्य आहे याचे उत्तर रखमा शोधते आहे.

रखमाचे मोठेपण सांगताना प्रा. वासुदेव मुलाटे म्हणतात,

"'निर्णय' सारख्या कथेत ग्रामीण स्त्रीच्या कर्तृत्वाचे एक वेगळे

दर्शन घडते. नवरा काम करीत नाही. सासू मुलं यांना पोसायचे असेल, जगवायचे असेल तर पोटात राहिलेले मूल होऊ देता कामा नये हा तिने मनाने घेतलेला निर्णय संकटाशी झुंज घेण्याच्या तयारीने घेतलेला निर्णय आहे." १२

तर 'अ' कथेतील तात्यांना आपल्या मुलांची होणारी परवड त्रास देते. मालकाचा राजू जे बालपण भोगतो आहे ते आपल्या मुलांपासून का दूर आहे असे त्याला वाटते. तर 'वाढदिवस' कथेतील ~~आणि~~ भागा रोजगार मिळणार नाही या भीतीने आपल्या कोवळ्या मुलाला न झेपणारे काम करायला सांगते आणि आपल्याच मनाची समजूत घालते. 'झुंज' कथेतील बाबूची आई तुरुंगातील आपल्या पतीच्या जीवनाचाच विचार करते. तुरुंगातील आपल्या पतीच्या जीवनाचाच विचार करते. पोलीसांचा मार, छळ, कष्टाची कामे तिच्या डोळ्यांपुढे उभी राहतात. तिच्याच चिंतनाने ज्याबांची टक्कर देण्याची वृत्ती अधिकच खुलून दिसते. 'कोसळलेली' कथेतील 'कोसा' आपल्या पतीच्या आजारपणाचा विचार करताना भूतकाळाचा विचार करते. पतीने आपले कसे कौतुक केले, आपणाला कसे सुख दिले, कष्टाची कामे करु दिली.

" पोटात मूल आडवे आल्याने आणि लवकर बाहेर काढू न शकल्याने बायकोच्या- रखमाच्या मृत्यूच्या कल्पनेने खचून गेलेला दामा सुटका (१३९) या कथेत भेटतो. मालकाची म्हैस अडलेली असते. तिची सुटका करण्यासाठी मालक त्याला शिव्या देतो. म्हैस मोकळी होते तिला रेडकू होते. पण घरची त्याची बायको मात्र आपण मोकळी करु शकत नाही. या कल्पनेने त्याच्या मनाची होणारी उलघाल द.ता.भोसले अत्यंत प्रभावीपणे व्यक्त करतात. अर्थात जनावरापेक्षाही आपले जीवन किती वाईट आहे. ही दामाच्या ठिकाणी असणारी जाणीवही येथे प्रतीत

होते. एकंदरीत द.ता.भोसले यांच्या कथेमध्ये मनोविश्लेषण हा एक महत्वाचा घटक आहे हे नोंदवावे लागते." [१३]

'मागणी' कथेतील बंका पत्नीने दिलेल्या कॉफीने तरतरीत होतो. प्राप्त परिस्थितीत आपण पोतराजाची भूमिका पार पाडू अशी त्याला प्रेरणा मिळते. "आपण कष्ट केले पाहिजेत. शेवटपर्यंत कष्ट केले पाहिजेत. असे त्याला वाटते. त्याचे मनातील चिंतन असा आकार घेते – "तंबाखूचा तुकडा दाढेखाली धरून उगवलेल्या सूर्याकडे तो नव्यानं बघावं तसा बघत बसला. झोपडीकडे पाठ फिरवून..... आयला या सूर्यनारायणाला बी सुटका नाय. रोज उगवायला. रोज मावळायचं. देवानं आखून दिलेल्या वाटेनंच जायाचं. पुन्हा मागी पुढं व्हायचं नाही. तोलाबी हे टाळता येत न्हाईच की, मला आपण तर कोण ? झिंझुरक्याचा पालाच. आपली तरी वाट कशी चुकलं. वाट चालताना फुफाटा होवूनच वाटेवर पडायचं. दुसऱ्याची वाट व्हायचं दुसरं काय ?" [१४] बंकाचे हे चिंतन त्याच्या मनातील उलघालच प्रकट करते. थोडक्यात हे मनोविश्लेषण उपरोक्त आशयसूत्रे अधिक स्पष्ट करते असे म्हणावेसे वाटते.

मनोविश्लेषणानंतर 'नाट्य' या घटकाचा विचार करावयाचा. हे नाट्य त्या त्या पात्राला भेडसावणाऱ्या प्रश्नातूनच अवतरते. 'पाउस' कथेतील 'भागूला' ती कष्टाळू असूनही चोर समजले जाते. तिच्या मुलाला खरे तर चहा बिस्किटे व थोडी आरोग्यसेवा हवी असते. तिच्या भोवती माणसांचा समुद्र असतो पण तिचे दुःख कोणी समजून घेत नाही. त्यामुळे तिला कोरडेपणा अनुभवावा लागतो. तर 'देवपूजा' कथेतील 'श्रीधरपंत' व 'कावेरी' या दांपत्याचे मुलांवर उत्कट प्रेम असूनही त्यांना मुलांची बेफिकीरी सोसावी लागते. तर 'जहाज' कथेतील 'जिजाईला' पतीच्या विसंगत वागण्याने उपेक्षा सोसावी लागते. बाहेरून संन्यस्त वृत्ती व अंतरंगात तर संसाराची

लालसा असे त्याचे नाटयपूर्ण वागणे आहे तर 'भेट' कथेत 'स्वामी' व 'गृहिणी' दोघेही स्वीकारलेल्या मार्गापेक्षा विरुद्ध मार्गाचाच विचार करतात. 'अनादर' कथेतील 'धर्मा' वर्तमानकाळात जगत असूनही भूतकाळात जगण्याचा प्रयत्न करतो. शोषणाच्या नाना त-हांचे दर्शन घेताना तर हे नाटय वेगवेगळी रूपे घेते. 'बाजार' कथेत चंपाची अब्रू लुटणा-या देसायाची शेव भानाला गोड लागते. 'ढासळलेली भिंत' मधील नायकाला शिक्षणातून मिळणारी इभ्रत पोकळ वाटते. 'निवडणूक' कथेतील चांगाला आपल्याला मिळालेले पुढारपण हे गावातील धनदांडग्याच्या दृष्टीने खेळणे झाले आहे असा अनुभव येतो. याच्यावर भाष्य करताना प्रा. वासुदेव मुलाटे म्हणतात,

" गाव पातळीवरच्या निवडणुका विशेषत: ग्रामपंचायतीच्या निवडणुका आणि या निवडणुकीच्या निमित्ताने गावातील सवर्ण धन-दांडग्यामध्ये जी चुरस असते, स्पर्धा असते त्याची झळ गरीबांना लागते. या कथेत भाऊसाहेब व कान्होजीराव या दोघांच्या सरपंच पदाच्या स्पर्धेत चांगा महाराला वेठीस धरण्यात येते. या ठिकाणी चांगाच्या अगतिक अवस्थेचे, दु:खी मनाचे जसे चित्रण येते तसेच ग्रामपातळीवरच्या श्रीमंत राजकारणी माणसांच्या कुटील नीतीचेही दर्शन घडते." १५

'चिनवणी' कथेत मुलाचा समजंसपणा व वडिलांचा बेजबाबदारपणा समोरासमोर उभे ठाकतात. जन्म व सुटका या कथेतील नायकांना दुस-याला जन्माला घालण्यापायी स्वत:ला जन्मातून उठावे लागते. रखमाचे आयुष्य बदलू शकण्याची शक्यता असलेला गर्भ पाडण्याचा निर्णय ती घेते. ऊन कथेतील काशा समंजसपणा दाखवितो तर मालकाचा राजू हट्टी आहे. 'वाढदिवस' कथेतील धर्माला त्याच्या श्रमावर शिजलेले अन्न त्याच्यावरच उलटते आहे की काय असा अनुभव येतो. शोषिताची आक्रमक

व पशुतुल्य वृत्ती व शोषकाची असहाय्यता यातूनच हे नाट्य निर्माण झाले आहे असे जाणवते. हे नाट्य कसे आपणाशी अंतर्मुख करते याविषयी प्रा. वासुदेव मुलाटे म्हणतात,

"'वाढदिवस' या कथेत दलितांना राबवून घेऊन कशी अवहेलना केली जाते याचे चित्रण आहे. खेड्यातील सामंतशाही अजूनही कशी तग धरून आहे याचे चित्र या कथेत उमटते. ग्रामीण, दलित शोषित समाजातील सोशिक माणसे प्रामुख्याने भोसल्यांच्या कथांचा विषय झालेली आढळतात. सर्व पातळीवरच्या शोषणाची, अन्यायाची जाणीव होऊनही ही माणसे परिस्थितीच्या भोव-यात अडकेलली दिसतात." [१६]

नाट्य या घटकानंतर 'जीवनदर्शन' या घटकाचा विचार करावयाचा. या कथासंग्रहातील ब-याच कथांना ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी आहे. हे जीवन बरेचसे उपेक्षितांचे, शोषकाचे आहे. 'पाऊस' कथेतील 'भागू' अन्नासाठी दाही दिशा भटकत असते तर 'देवपूजा' कथेतील 'श्रीधरपंत' मध्यमवर्गीय असून देखील योग होमासाठी लाचार असतात. 'जहाज' कथेत 'जिजाई' लौकिक अर्थाने संसारी असते पण विधवेचे जीवन जगत असते. 'भेट' कथेतील 'स्वामी' कुष्ठरोग झाल्यावर कुष्ठधामाला जातात. बरे होतात. खरे तर प्रपंचाने त्यांना खूप काही शिकवलेले असते. म्हणजे या जगाविषयी त्यांच्या मनात घृणा निर्माण व्हायला हवी होती. त्यांच्या वासनांचे दर्शन घडते. तसेच संसारात तृप्त असणारी गृहिणी परमेश्वराच्या ओढीने देवळाकडे येते. तर 'अनावर' कथेतील 'धर्मा' आपल्या गावाची भूतकाळाची आठवण वर्तमानकाळाच्या जीवनातून बाजूला ठेवू शकत नाही. 'बाजार' कथेतून जाणवते की विधवा स्त्रीला कष्ट करून अब्रूने जगण्याची चोरी आहे. 'ढासळलेली भिंत' मध्ये बेकार तरूणाचे वैफल्य समोर येते.

'निवडणूक' कथेत 'चांगा' या दलिताची घुसमट शब्दांकित झाली आहे. 'विनवणी' कथेत आईला वाचविण्याची मुलाची धडपड दिसते. त्याचे वडील त्याची सावत्र आई ही संवेदना हरवलेली पात्रे आहेत. 'जन्म' व 'सुटका' कथातील शेतमजूर नगण्य आहेत. जनावरापेक्षाही त्यांच्या जिण्याला कमी महत्व आहे. त्यांच्या दुःखात मालक मदत करीत नाहीत तर त्यांच्यासारखेच गरीब लोक मदत करतात. 'निर्णय' कथेत परित्यक्तेचे दुःख समोर येते. केवळ कष्ट करून पोट भरता येत नाही. माणूस म्हणजे जनावर नाही. त्याच्या शरीराइतकेच त्याचे मनही महत्वाचे आहे. पतीच्या बेजबाबदारपणाने ही परित्यक्ता 'रखमा' गर्भपात करण्याचा निर्णय घेते. 'ऊन' कथेत शेतमजूराची सोशिकता दिसते. 'वाढदिवस' कथेत चांगले खायला मिळेल म्हणून लाकडे फोडणा-या मुलाचे दर्शन घडते. ग्रामीणजीवनात शोषण हे एक प्रकारचे नसते. ते विविध प्रकारचे असते. सामान्यांचे कष्ट, त्यांच्या भावनांचे एवढेच नव्हे तर प्राणप्रिय व्यक्तींचे व मूल्यांचे देखील शोषण ग्रामीणजीवनात कसे होते हे या कथांवरून लक्षात येते..

या कथांमध्ये केवळ 'भूक' अथवा 'शोषण' यांचे दर्शन घडत नाही तर परिस्थितीशी टक्कर देणारे मनही येथे आविष्कृत झाले आहे. आणीबाणीत अनेकांनी तडजोडीची वाट स्वीकारली. पण 'झुंज' कथेतील स्वातंत्र्यसैनिक त्याग, स्वातंत्र्य ही प्राणप्रिय मूल्ये आहेत असे मानून त्या वाटेने जातात. 'कोसळलेली' या कथेतील नायिका धीट, धीराची आहे. घरातील घागर गहाण ठेवून प्रसंगी देताच्या मूर्ती घोरून ती, संसार व्यवस्थित राखण्याचा प्रयत्न करते तर 'मागणी' कथेतील बंका आजारी असतानाही आपल्या कुटुंबाचा गाडा चालावा म्हणून पोतराजाचे काम करतो. हे जीवनदर्शन अनेकांगी आहे. दारिद्र्यात व गरिबीत आविष्कार एकपदरी नसतो. तो संमिश्र असतो. येथे अनेकांचीच धडपड चाललेली

आहे• हे जगणे केवळ शारीरिक पातळीवरचे नाही तर मानसिक पातळीवरचे देखील आहे•

जीवनदर्शनानंतर 'ग्रामीण वास्तवाचा' विचार करावयाचा• ग्रामीण वास्तव हे व्यक्तिकेंद्री असते• तसेच समाजकेंद्रीही असते• या वास्तवात काही पात्रे केंद्राच्या ठिकाणी असतात तर काही परिघा[illegible]च्या ठिकाणी असतात आणि या ग्रामीण वास्तवातून समूह मनाचा गजर आपणाला ऐकू येतो• 'पाऊस' कथेत झोपडपट्टीतले जीवनदर्शन घडते; पण झोपडपट्टी खेड्यातून आलेल्या लोकांचीच आहे• जे शोषक असतात ते शोषितांची नड भागवत नाहीत• तर शोषितांचे भावबंध इच्छा असूनही आपल्या पीडित बांधवाची नड भागवू शकत नाहीत हे 'पाऊस' कथेतून लक्षात येते• 'देवपूजा' कथेत मुलांनी दुर्लक्षिलेले वृध्द दाम्पत्य प्रतिकूल परिस्थिती, आजार यांना तोंड देत लाचारी, नम्रता दाखवत चिकाटीने दिनक्रम पार पाडताना दिसते• 'जहाज' कथेतील परित्यक्ता केवळ कष्ट करीत असते• आपल्यावर झालेल्या अन्यायाचे दुःख आठवत संस्काराला जपतच जगते• 'भेट' कथेत माणसाच्या मनात ईश्वराविषयीचा सात्त्विक भाव आणि शारीरसुखाची अनावर ओढ या भावना एकाच मनात कशा राहत असतात हे दिसते•

'अनावर' कथेत माणूस आपल्या मातीशी किती व कसा बांधलेला असतो व तेथून उपटून काढल्यावर पाण्याशिवाय तडफडणा-या माशासारखी त्याची कशी अवस्था होते हे लक्षात येते•

ग्रामीण जीवनाची ही सारी ससेहोलपट चित्रित करण्याचे द•ता• भोसले यांचे कौशल्य प्रा•एस•एम•कानजे यांनी पुढीलप्रमाणे वर्णिलेले आहे•–

"प्रा. द. ता. भोसले यांचे ग्रामीण जीवनाविषयीचे आणि त्या समाजासंबंधीचे साक्षेपी चिंतन आणि मूलगामी विचार अंतर्भेदी व वास्तववेधी आहेत. बहुसंख्य ग्रामीण जनतेला आजही नानाविध दुःख यांना सामोरे जावे लागते. या ग्रामीण जीवनाला अजूनही दैन्य-दारिद्र्याचा, शोषण, उपासमारीचा, फसवणूक, दडपशाहीचा जीवघेणा विळखा घट्टपणे वेढून बसला आहे. दुःख, भूक, शोषण, दारिद्र्य, उपासमार, अगतिकता आणि सरंजामी वृत्ती या साऱ्या दुष्ट शक्तींनी सर्वसामान्य ग्रामीण जनतेवर शापित आणि उध्वस्त जीवनाचे ओझे लादलेले आहे. अशा या सर्वस्वी तिरस्करणीय व घृणास्पद जीवनाचे हे जीवन जगणाऱ्या शोषित-वंचित, नाडलेल्या-पिडलेल्या स्त्री-पुरुषांच्या जीवनानुभवाचे, त्यांच्या अनुभवातील ताण-तणावाचे आणि त्या ताण-तणावातील वेदनांचा पाऊस सजीव-साकार करणारे हे कथा लेखन आशयसंपन्न व कलात्मक आहे. यात शंका नाही.."[१७]

आत्तापर्यंत आपण आशयदृष्ट्या या कथांचा विचार केला, यानंतर या कथांची 'अभिव्यक्ती वैशिष्टये' पाहण्याचे योजिले आहे. त्यापैकी 'शीर्षक' या वैशिष्टयाचा विचार करताना लक्षात येते की, 'पाऊस' हे शीर्षक केवळ निसर्गातला पाऊस आपणापुढे उभा करीत नाही; तर डोळ्यातला पाऊसही उभा करते. पात्रांचा शोकात्म भाव शीर्षकातून स्पष्ट होतो. 'पाऊस' हे जरी एका कथेचे नाव आहे तसेच ते कथासंग्रहाचेही नाव आहे. यातील सर्वच कथा दुःखितांच्या आहेत. शोकात्म भाव व्यक्त करणाऱ्या आहेत त्यामुळे हे शीर्षक अन्वर्थक वाटते. 'देवपूजा' कथेचे नायक श्रीधरपंत यांना पोटपूजेसाठी देवपूजा करावी लागते. त्याची त्यांना खंतही वाटते. कारण आपण देवपूजा देवासाठी करीत नसून पोटासाठी करीत आहोत असा भाव सतत त्यांच्या मनात असतो. 'जहाज' कथेत जिजाईच्या

स्वप्नाचे जहाज संसार-संन्यास या दोन किना-यांना स्पर्श करीत पुढे जात राहते तर 'भेट' कथेत संसारी वृत्ती व संन्यस्त वृत्ती यांची भेट होते. स्वामी संसारात पोळलेले असतात. संन्यस्त वृत्तीचा स्वीकार करतात. परत संसाराची ओढ त्यांना वाटते तर या कथेतील गृहिणी संसारात तृप्त असते. संन्यस्त वृत्तीची तिलाही ओढ असते पण परत ती संसाराचा विचार करते. 'अनावर' कथेत वर्तमानातून धार्मा भूतकाळाकडे धावत असतो. या भावनेची विवेकावर मात होते. भूक अन्नाची काय, वासनेची काय किंवा भावनेची काय जेव्हा अनावर होते तेव्हा ती विवेकावर मात करते असे दिसते, 'बाजार' हे कथाशीर्षक व्यवहाराचे प्रतीक आहे येथे शोषिताला चंपा या नायिकेला बाजारातील वस्तूंचा किंमत देसायाच्या दृष्टीने आहे तर 'ढासळलेली भिंत' मध्ये नायकाच्या मनातील नरात्या इभ्रतीची भिंत ढासळते. या इभ्रतीने त्याचा अहंकार फुलवलेला असतो पण ते मृगजळ आहे. हे त्याला शेवटी पटते. तर 'निवडणूक' हे शीर्षक सामान्यांची ससेहोलपट जशी समोर आणते तशीच लोकशाही मूल्यांची विटंबनाही आपल्यापुढे उभी करते. 'विनवणी' या शीर्षकातून साहेबरावची आवाहनात्मक भाषा रसिकाच्या मनात रेंगाळत राहते तर 'जन्म' शीर्षकात कोणाचा जन्म कोणाचा मृत्यू हा दाहक अनुभव आपणासमोर उभा राहतो. सुटका हे शीर्षक दुःखातून शोषिताची 'सुटका' होणारच नाही हा भाव अधोरेखित करते. तर 'निर्णय' हे शीर्षक रखमाच्या मनात भविष्य व वर्तमान यांच्यातील लंबक कसा स्थिर करावयाचा याचे उत्तर देते. 'अ' या शीर्षकातून गरीबाचा उभा जन्म उन्हातच राहणार हा भाव दिसतो. 'वाढदिवस' हे शीर्षक शोषकाच्या दृष्टीने वाढदिवस कसा असतो आणि शोषिताच्या दृष्टीने कसा असतो हे स्पष्ट करते. 'झुंज' हे शीर्षक बहुसंख्य संधीसाधू लोकांविरुद्ध मूल्य मांडणारी एक अल्पसंख्य व्यक्ती कशी लढते,

झुंज देते हा भाव व्यक्त करते तर 'कोसळलेली' हे शीर्षक जीवनसंग्रामात लढता लढता कोसळणारी आशा साकार करते. 'मागणी' हे शीर्षक लाचारपणाऐवजी कष्टावर मागणी करणाराला देखील वाटाण्याच्या अक्षता परिस्थिती कशा लावते हा भाव व्यक्त करते. थोडक्यात ही शीर्षके अन्वर्थक आहेत. कथानकाचे सारस्य शीर्षकातून स्पष्ट होते.

यानंतर 'संवाद' या घटकाचा विचार करावयाचा. या कथासंग्रहातील संवाद काही वैशिष्ट्यांनी नटलेले आहेत. त्याचे सोदाहरण विवेचन करण्याचे योजिले आहे. विस्तारभयास्तव एकेक उदाहरण घेतले आहे. व्यक्तिचित्रावर प्रकाश टाकणे हे या संवादाचे एक वैशिष्ट्य आहे. साहेबरावची सावत्र आई व साहेबराव यांच्यातील 'विनवणी' कथेतील संवाद असा आहे. "ती बाई त्याला म्हणाली, 'काय होतय तुझ्या आईला ? 'ताप येतुया. चांगला पंधरा वीस दिस झालं."

' औषधपाणी केलया ? तिने विचारले.'

' तसं गोळ्या काढा दिला. पण गुण न्हाई.'

' हेच्या परीस इंजेक्शन दियाला पाहीजे.'

' असे ती वळून तात्याला म्हणाली', 'पाच-दहा रुपये द्या त्येला.'

' पैसे नकू मला' त्यावरील तात्यांनी भेटावं आईला. म्या न्यायलाच आलुया. त्यानं आग्रही सूर लावून म्हटलं."

"सायबा, तू असं कर, तू जा पुढं. मी दोन तीन दिसानं नक्की येतो." [१८] हा संवाद साहेबरावची दुसरी आई. साहेबराव, तात्या यांच्या व्यक्तिचित्राचे काही विशेष स्पष्ट करणार आहे. आपली सवत असली तरी तिच्या प्रकृतीला आराम पडावा असे या सावत्र आईला वाटत असते. तर साहेबरावला कोणत्याही परिस्थितीत आपल्या आईची

व वडिलांची भेट व्हावी व आईवर औषधोपचार व्हावा असे वाटत असते, तर तात्याला ही भेट टाळावी असे वाटत असते. थोडक्यात माणुसकी, मातृप्रेम व बेजबाबदारपणा ही वैशिष्टये या संवादातून स्पष्ट होतात हे संवाद माणसाच्या मनाचा मागोवा घेतात. 'देवपूजा' कथेतील कावेरी व श्रीधरपंत यांच्यातील संवाद असा आहे. "अंगावरची काळसर चिंधी दूर सारत ती नव-याला म्हणाली, पोरांना नका पत्र टाकू. माझं हे कायमचंच आहे. 'ती येवून तरी काय करणार आहेत'? थोडा वेळ थांबून स्वत:शीच बोलावं तशी ती म्हणाली, आणि पत्र टाकू देखील किती येतील कुणास ठाऊक! दोघांनाही त्यांचे संसार आहेत. मुलंबाळं आहेत. नोक-या आहेत. थकलेल्या आईबापांना सारखं भेटणं त्यांना या महागाईत परवडणार नाही."

"तुझंही खरंच आहे. मागं पत्र लिहिली पण आले नाहीत. पाच-पंचवीस रुपये देखील कुणी पाठवून दिले नाहीत. श्रीधरपंताचा सूर चढला[19].

आपल्या जीवनाची कोंडी कोणामुळे झाली ? आपण कर्तव्य बजावले. मुले अशी का वागतात या विषयीचा सारा राग, निराशा या संवादातून प्रकट झाली आहे. कथानकाला गती देणे हे ही संवादाचे एक वैशिष्टय आहे. काशी, तिची आई भागू यांच्यातील संवाद असा आहे.

"म्या काय तरी दया, असं लय काकुळतीला येवून मागितलं आई."

पावसा पाण्याचा कुठला ग पैसा ? मीच लय अडचणीत आलुया म्हणावं."

"तरं तरं मायंदळं अडचणीत असशील बाबा." [20]

'पाऊस' कथेतील मिस्त्रीवरचा राग उपरोधाने भागू अशी व्यक्त करते. असे हे संवाद अनेक प्रकारचे काम करतात.

या कथेची भाषा प्रामुख्याने ग्रामीण आहे. कधीकधी अधून-मधून ती शहरी रूपही समर्थपणे व्यक्त करते. पण " आये तू मला शिकवलं नसतं तर बरं झालं असतं बग " [२१] हे 'टासळलेली' भिंत मधील नायकाचे म्हणणे ग्रामजीवन, त्यातील दारिद्र्य त्यातील कोंडी अधिक स्पष्ट करते तर, "काय थाट हुत्ता नाय वरातीचा! काय ते दारुकाम, काय ती सजवलेली आपली गाडी! माणसांची गर्दी! आठवतंय तुला"? "[२२] हे 'अनावर' कथेतील धामधि म्हणणे त्याची भूतकाळाविषयीची ओढ समर्थपणे प्रकट करते. तर 'झुंज' कथेत माझी काळजी करू नका. येथे संघाचे, समाजवादी पक्षाची, जनसंघाचे सर्व मंडळी आहेत. मोठी धीराची माणसं, ताठ राहणारी, धैर्य न खचलेली. त्यांच्याकडे पाहिले की माझी इतके दिवसांच्या उपेक्षेची मला खंतही वाटत नाही." [२३] हे बाबांचे म्हणणे त्यांचा मूल्यावरील विश्वास व त्यांची आचार विचाराची सुसंगतीच स्पष्ट करते.

ही भाषा कधीकधी काव्यात्म बनते. जिजाई सारवत असताना पुढील वर्णन येते. "पातळ झालेल्या शेणाचा धार जिजाई जमिनीवरून फिरवीत होती. पाणी घालून ती तो धार अधिक पातळ धार जमिनी-वरच्या शेणाने निपटून घेत होती. पाणी घातलेल्या शेणाचा एक दर्प खोलीत पसरला होता. जमिनीला एक फिक्कट प्रकारचा हिरवा रंग चढत होता. उजव्या हाताने जमिनीवर ती अर्धगोलाकार काढत काढत पिवळसर जमिनीला सौम्य हिरवा रंगाचा शालू नेसवत होती. हात फिरत होता. ओल मुरत होती. रंग उरत होता." [२४] कष्टाचे काम करत असताना जिजाईच्या मनात जे चिंतन चालले होते तिच्या मनापुढे जी दुःखे तरळत होती त्यांना आपल्या कामातूनच मूर्त रूप देण्याचा जिजाई प्रयत्न करीत होती. या काव्यात्म भाषेला एक लय आहे. तिच्यात कल्पना वैभवाचा

देखील भाग आहे असे जाणवते.

कधीही काव्यात्म भाषा पात्राच्या मनापर्यंत रसिकांना अगदी सहजपणे आणून ठेवते. दुपार कलली. झाडांच्या बुंध्याजवळ विसावलेल्या सावल्या हळूहळू पूर्वेकडे रांगू लागल्या. वाऱ्याची झुळूक झाडांच्या शेंड्यांना कुरवाळू लागली. गवताची पाती सावली अंगावर घेत नाचू लागली. कळसाची मध्यापर्यंत न दिसणारी सावली जरा सुकू लागली. शेजारच्या तळ्यावर लाटांची नक्षी उमटली. पाणी भरणाऱ्या माणसांची वर्दळ वाढू लागली. उन्हातून जीभ बाहेर काढून भटकणारे एक काळे कुत्रे ल्हा ल्हा करीत देवळाच्या पायऱ्याजवळ विसावले. गावातले एक चुकार जनावर पाण्याच्या आशेने तळ्याच्या काठाने साचलेल्या डबक्यातून तोंड घालू लागले. तहान भागल्याने ते अवती भवती शोधाशोध करीत होते. तळ्याच्या पायऱ्याजवळ दगडी कुंडात असलेले गढूळ पाणी जिभेने पिऊ लागले. देवळाच्या खांबाची सावली तळ्यातल्या पाण्यात हलणाऱ्या तरंगाबरोबर हलू लागली. स्वामींनी तोंडावर घेतलेले भगवे वस्त्र डोळे किलकिले करीत दूर सारले." २५ हे वर्णन निसर्ग, प्राणीजीवन यांचा निर्देश करीत करीत स्वामीवर स्थिरावते. स्वामींच्या मनाची काय अवस्था असेल याविषयी रसिकाच्या मनात उत्सुकता निर्माण करते.

प्रा. वासुदेव मुलाटे यांनी द. ता. भोसले यांच्या भाषाशैलीची नेमकी वैशिष्टये टिपलेली आहेत, ते म्हणतात -

" द. ता. भोसल्यांच्या कथेत निवेदन नागरी भाषेत येते अर्थात ही नागरी भाषा अगदीच शुध्द स्वरूपाची व ग्रांथिक वळणाची नाही तरीही ती नागरी सामान्य माणसाची भाषा आहे असे जाणवते. त्यांच्या मागणी या कथेची सुरूवात त्या दृष्टीने बघण्यासारखी आहे. तोंडावर

घोतलेली वाकळ बंकानं जराशी बाजूला सारली. किलकिल्या डोळ्यांनी त्यान झोपडीत गच्च दाटलेला अंधार बघितला आणि पुन्हा डोळे मिटून घेतले. मिटल्या डोळ्यांनीच त्याने मनातल्या मनात दिवस मोजले. एक दोन तीन चार आजचा हा तापाचा पाचवा दिवस त्याला आपली जीभ पार कडू कडू झाल्यासारखी वाटली. तोंड सारं घाण झाल्यासारखं वाटलं जिभेच्या टोकावर कसला तरी घाण थर साचल्यासारखं त्याला वाटलं." २६

यानंतर या 'कथांच्या निवेदन पध्दतीचा' विचार करावयाचा. 'बाजार', 'वाढदिवस', 'झुंज', 'कोसळलेली' या कथांची तृतीयपुरुषी निवेदन पध्दती आहे. 'बाजार' कथेतील तृतीय पुरुषी निवेदन पध्दती चंपा, देसाई, भागा, म्हातारी यांचे स्वभाव विशेष स्पष्ट करण्यास साह्यभूत ठरते. 'वाढदिवस' कथेतील तृतीय पुरुषी निवेदन पध्दती ही धर्माच्या व्यथा, वेदना अधिक स्पष्ट करते. 'झुंज' कथेतील तृतीय पुरुषी निवेदन पध्दती बाबांचे एकाकीपण, कुटुंबीय व समाज यांचे यथार्थ शब्दांकन करते. 'कोसळलेली' कथेतील कौसाचा पती ठणठणीत बरा व्हावा यासाठी तिची चाललेली धडपड रसिकाला अंतर्मुख करते ती या निवेदन पध्दती मुळेच या कथासंग्रहातील बाकीच्या कथा प्रथमपुरुषी निवेदन पध्दतीचा अवलंब करणाऱ्या आहेत. 'पाऊसमधील' भागू, 'देवपूजामधील' श्रीधरपंत, 'जहाजमधील' जिजाई, 'भेटमधील' स्वामी, 'अनावर' मधील धर्मा यांचे शरीर, मन व अध्यात्माच्या ज्या भुका आहेत त्याचे यथार्थ रूप या निवेदन पध्दतीमुळे आविष्कृत होते. 'ढासळलेली भिंत' मधील नायक, 'विनवणी' मधील साहेबराव, 'जन्म' मधील गेना, 'निर्णय' मधील रखमा यांच्या वेदना, युक्तिवाद हे सगळे प्रथमपुरुषी निवेदनपध्दतीमुळे स्पष्ट होतात.

या कथातील अलंकारवैभाव देखील विलोभनीय आहे. उपमा, प्रश्न हे अलंकार अधिक येतात. 'झुंज' कथेत पुढील वाक्ये येतात -

"मुळ्या खुडलेल्या रोपट्यासारखं आमचं घरं झालं" २७ बाबा तुरुंगात गेल्यामुळे त्या घराला निराधारपण आले. अस्थिरता आली. ती या उपमेने अधिक स्पष्ट होते. तर 'कोसळलेली' कथेत दाजीचे वर्णन असे येते. " केस एखाद्या पिंजलेल्या वाखासारखे झालेले." २८ 'कोसळलेली' कथेतील आजारपणाने दाजीची काय दशा झाली, त्याचे शरीर कसे मलूल झाले याची कल्पना यावरून येते. तर 'मागणी' कथेत बंकाचे असे वर्णन येते. 'तो झोपडीच्या एका लाकडाचा आधार घेऊन बसला. कापसाच्या पळकाट्या जळणासाठी चुलीच्या कोपऱ्यात ठेवाव्या तसा.' (१६२) बंकाचा आजार त्याचे थकलेपण हे या उपमेतून प्रभावीपणे शब्दांकित होते.

उपमेप्रमाणे प्रश्न अलंकाराचाही येथे कलात्मकतेने वापर केलेला आहे. "जनावरं तरी तोंडात धरील का हा तुकडा" (पाऊस -पृ.५), (लोकांच्या भिकेविषयी भागूने केलेले भाष्य.) " पण उशीर होतोय पूजेला आज-काय खरं नाय ? (देवपूजा-पृ.१६), (गुणाजीरावाचे श्रीधरपंताच्या पूजेविषयीचे निरीक्षण), " त्या सभापतीला तरी भेटावं का ? (ढासळलेली भिंत -पृ.३१) (प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारा नायकाच्या आईचा प्रश्न).

या अलंकार वैभावाप्रमाणेच या कथात प्रतीके येतात. पृ.१३३वर "म्हातारा बैल" तर पृ.१४६ वर "खांथ करणारी गाय" ही प्रतीके येतात. म्हातारा बैल दीनवाण्या चेहऱ्याने बसलेला असतो. त्याच्यासारखेच 'उन' कथेतील तात्या या शेतमजुराचे जीवन आहे. तो बैल जसा आशाळभूत-

-पणे तात्याकडे पाहत होता तसा तात्या आपल्या मालकाकडे पाहत होता. ते दोघेही मालकाच्या शेतात राबलेले होते.'कोसळलेली' कथेतील नायिका आपल्या नव-यासाठी औषधपणी केले पाहिजे या विचाराने प्रयत्न करते आहे. तिला महादेवाच्या देवळाजवळ घांधा करणारी गाय दिसते. त्या गायीच्या डोळ्यांजवळच्या जखमेतून रक्त येत होते. आणि कावळा त्याचे लचके तोडून नेत होता. या नायिकेची अवस्था या गायी-सारखी झाली आहे. तिला वाटते की, आपल्या संसारावर गरिबीची जखम झाली आहे. आणि नशीब त्यावर चोच मारत आहे आणि नव-याच्या जीवाचा तुकडा उचलून नेते आहे.

या प्रतीकाप्रमाणे 'फॅन्टसीचेही' दर्शन या कथांत येते. गुणाजी-रावाच्या वाड्यात पंत गेल्यावर एक दृश्य दिसते ते असे." पंतांनी शेजारी चहाची रिकामी कपबशी पाहिली. त्यावर माशा घोंघावत होत्या. त्यातली एक माशी घेवून बशीतल्या चहाचा थेंब पिवून घ्यावासा वाटला." (देवपूजा-पृ.१५) श्रीधरपंतांनी पाहिलेले दृश्य व चहाची त्यांना झालेली तलफ यातून ही फॅन्टसी अवतरलेली आहे तर'जहाज'कथेत पुढील वर्णन येते." ताटली घेऊन प्रथम नजरेनेच तिनं आस्वाद घेतला. हिंदकूळ-णा-या ताकाचे मनानेच भराभरा घोट घेतले." (जहाज-पृ.८५) यातील मनाने ताकाचे घोट घेणे यातून ही फॅन्टसी शब्दांकित झाली आहे. पात्राच्या मनातील अमूर्त भावना या फॅन्टसीने अधिक मूर्त झाल्या आहेत.

या कथांचे आणखी एक वैशिष्ट्य' डॉटचे' कलात्मक उपयोजन पृ.१६ वर'देवपूजा'कथेत पुढील वाक्य येते." पण.... मला वाटतं,जाता जाता तुम्ही सुध्दा देवाला नमस्कार करीत जावा." (पाऊस पृ.१६)

(पुरोहितांनी पूजा करताना यजमानाने सुध्दा नमस्कार करणे आवश्यक हा श्रध्दायुक्त भाव अढळत पूर्ण करण्याचा श्रीधरपंतांचा प्रयत्न)'असू दे मालक सध्यांना असचं देतात आपुन उद्याला यावं म्हणून....'(बाजार पृ.२३) ( शोषणाचा दाह कमी करण्या चंपाच्या मैत्रिणीने केलेला प्रयत्न). तेवढ्यात मेढीचा आधार घेऊन उभा असेलेला अधिकराव म्हणाला,'भाऊसाब त्या परीस आपुन त्या पिराच्या कट्टयावर बोललं तर.......'? (निवडणूक पृ.३६).[भाऊसाहेबांना संकेतदर्शन सूचना करण्याचा अधिकरावाचा प्रयत्न.]

कथारचनेच्या दृष्टीने या कथांचा आरंभ शेवट पाहणे अगत्याचे आहे.'कोसळणारा पाऊस'हा'पाऊस'कथेच्या आरंभी येतो व कथेच्या शेवटी बघ्यांचा घोळका भागूभोवती असतो. आकाशातला पाऊस काय किंवा बघ्यांचा म्हणजे माणसांचा पाऊस काय यांच्यात भागूचे दुःख कमी करण्याची शक्ती नाही असे जाणवते.'देवपूजा'कथेची सुरुवात श्रीधर-पंताच्या दिनचर्येने होते. आपले कसे होणार ही चिंता त्यांच्या मनाला लागून राहिलेली असते. कथेच्या शेवटी ते रडू लागतात. पिशवीतून दूध सांडते आहे याकडेही त्यांचे लक्ष नसते. काळजीचा ताण सतत त्यांच्या मनावर आहे हेच यावरून जाणवते.'जहाज'कथेचा आरंभ जिजाईच्या धुण्याच्या पिळ्याने होतो. हा पिळा तिच्या मनाचाही असतो. तो तिला सोडवायचा असतो. म्हणून तर ती तेलाची वाटी व उदबत्त्या घेऊन देवळाकडे जाते.'अनावर'कथेचा प्रारंभ धर्माला पहाटे जाग येण्याने, स्वप्न पडण्याने होतो व कथेचा शेवट स्वप्नाचीच जाणीव करून देणारा आहे.'बाजार' कथेची सुरुवात दाटून आलेल्या अंधाराने होते. हा अंधार अशुभसूचक आहे. कथेचा शेवटही अशुभताच अधोरेखित करतो. गुलाचे समाधान,

उगवलेला सूर्य यापेक्षा चंपाच्या हृदयात अब्रू लुटल्याची जळती जाणीव प्रभावी असते. 'ढासळलेली भिंत' या कथेची सुरुवात नायकाने एस्टीतून उतरण्याने व रात्र पडणार आहे याचा संकेत व्यक्त करण्याने होते. व शेवटही रात्र दुःखदायी आहे हा भावच व्यक्त करण्याने होतो. 'किनवणी' कथेचा प्रारंभ अंधारून येण्याने होती व शेवटही आक्रोश वाढण्याने म्हणजे तो अंधार कमी न होण्यानेच होतो. 'जन्म' कथेचा प्रारंभ पावसाच्या कोसळण्याने होतो. हा पाऊस गरीबांना भिजवणारा त्यांच्या डोळ्यातही दुःखाचा पाऊसच निर्माण करणारा आहे. असेच कथा संपल्यावर वाटते. कथेतही पावसानेच प्रारंभ होतो. 'निर्णय' कथेचा प्रारंभ दिवस बुडाल्यावर रखमाला निरोप मिळाला या आशयाच्या वाक्याने होतो तर कथेचा शेवट तिने घेतलेल्या निर्णयाने तिच्या मनाला विसावा मिळाल्याने होतो." ऊन" कथेचा प्रारंभ शेतमजुराच्या कामाने होतो व शेवटही कामानेच होतो. काम आणि ऊन हे एकमेकांशी अगदी संबंधीत आहेत हाच भाव या आरंभ शेवटातून सुचित होतो.'वाढदिवस' कथेचा प्रारंभ दिवस मावळण्याच्या सूचनेने होतो. हा मावळणारा दिवस धर्माला अशुभसूचकच आहे. त्याला खूप काम करावे लागते व शेवटही धर्माच्या आजारपणाने होतो.' झुंज' कथेचा प्रारंभ रात्रीची वेळ, आणीबाणी, रेडिओचा कार्यक्रम यांनी होतो. प्रारंभच प्रश्न निर्माण करतो व कथेचा शेवटही प्रश्नानेच होतो.' कोसळलेली' कथेचा प्रारंभ नव-याची हाक ऐकण्याने होतो तर कथेचा शेवट कौसाला देवळातल्या घंटाचा आवाज ऐकू येतो.' मागणी' कथेचा प्रारंभ तोंडावरची वाकळ सारून उठणा-या बंकाच्या दर्शनाने होतो तर शेवट बंकाच्या बेशुध्द होण्याने व जोंधळे शेळ्या खातात याने होतो. या कथांचे आरंभ शेवट शोकात्म भाव प्रकट करतात. ही दुःखी, दुर्दैवी पात्रे शोषक परीस्थिती,

देव यांची शिकार होतात असे दिसते.

या कथात काही दोषही आहेत.'बाजार'कथेत पृ.२६ वर चंपा बरोबरच्या बायकांना सोडून पाणी पिण्यासाठी रात्र होत असताना देखील थांबते व देसायाच्या तावडीत सापडते. हा सगळा प्रसंग योगायोगावर आधारलेला वाटतो. कारण चंपा तशी असुरक्षित असते त्यामुळे तिने बायकांबरोबर जाणे इष्ट होते. या योगायोगामुळे कथेत कलात्मकता काही प्रमाणात शाबलित होते. पृ.१३२ वर' जन'कथेत धामाच्या लाकडे फोडण्याचे वर्णन येते आणि ते वर्णन त्यातील भाव, शब्दरचना ही ग्रामीण जीवनापासून कितीतरी दूर आहेत. तात्यासारख्या शेतमजुराला असे सुचणार नाही म्हणून हे वर्णन स्वाभाविक वाटत नाही.

हे दोष जरी या कथात असले तरी देखील या कथांतून शोषक व शोषित यांचे वर्तन, त्यांच्या समस्या तसेच त्या वर्तनापाठीमागे असलेली वृत्ती लेखकाने कलात्मकतेने रेखाटलेली आहे, असे म्हणावेसे वाटते .

या कथा जीवनाच्या काही मूल्यांचा आविष्कारही सादर करतात. 'बाजार' कथेतील नायिकेची,शील जपण्याची धडपड आहे. तर'ढासळलेली भिंत'मधील नायक आत्मपरीक्षण करतो आहे. शिकल्यामुळे त्याच्या मनात जीवनाविषयीच्या काही उच्च अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. पण समाज असा आहे की त्याच्या या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. बाहेरचे जग सुशिक्षित आहे पण त्याच्या भावभावनांची त्या जगाला कदर नाही. 'निवडणूक' कथेत ग्रामजीवनातले तिढे आहेत. गावकुसाबाहेरचा अस्पृश्य गावचा सरपंच झाला. खरे तर तो गरीबांचा,बहुसंख्य मतदारांचा प्रतिनिधी,पण त्याला स्वतंत्रपणे कारभार कोण करु देणार.हजारो

वर्षे ज्यांनी सत्ता भोगली ती मंडळी पडद्यामागून सूत्रे हलवत असतात. आणि त्यात या गरीबाचा बळी जातो. खेड्यातील जीवनात कसे तिढे असतात याचे दर्शन या कथेतून घडते. ग्रामजीवनात एक प्रकारची बधिरता असते. सरंजामशाही वृत्तीने माणसे जगत असतात. 'विनवणी' कथेतील तात्या आपल्या पत्नीचा, मुलाचा अजिबात विचारच करीत नाहीत. त्यांच्या वृत्तीतून एक प्रकारची निष्ठुरता, बधिरताच स्पष्ट होते. 'जन्म' व 'सुटका' या कथेतून शेतमजुरांवर होणारा अत्याचार स्पष्ट होतो. गरीबांचे जीवन पाचोळ्याप्रमाणे असते. कोणीही तो पाचोळा तुडवावा अशी अवस्था असते. स्वार्थ माणसाला किती आंधळा करतो हे या दोन्ही कथांतील मालकाच्या वर्तनातून जाणवते. परिस्थितीमुळे माणसाची केवढी कोंडी होते हे निर्णय, ऊन, वाढदिवस या कथांतून लक्षात येते. ही सगळी पात्रे कष्ट करत असतात. या कथांतून परिस्थितीशी दोन हात करण्याची वृत्तीही स्पष्ट होते. भले त्यात यश येवो वा ना येवो. झुंज कथेतील स्वातंत्र्यसैनिक कष्टाचा, त्यागाचा मार्ग स्वीकारतात; पण करणखरपणे, बाणेदारपणे परिस्थितीवर मात करत असतात. 'कोसळलेली' कथेतील नायिकेच्या मनात पापपुण्याचा संघर्ष असतो पण संस्कार प्रबळ होतात व देवाच्या मूर्ती चोरल्या हे पाप केले असे तिला वाटते. मागणी कथेतील बंका हा कुटुंबप्रमुखाच्या कर्तव्य भावनेने पेटलेला आहे तो आपली सर्व शक्ती पणाला लावून कुटुंबासाठी धडपडत असतो. जो तो आपापल्या परीने परिस्थितीची कोंडी फोडण्याचा प्रयत्न करीत असतो.

ग्रामीण वास्तव यामध्ये ग्रामीण जीवनात सामान्यपणे गावातील समाज व गावकुसाबाहेरील समाज असे दोन भेद पडतात. गावामधील

समाजात आर्थिक परिस्थितीनुसार उतरंड असलेली पाहवयास मिळते. या कथासंग्रहात पाऊस कथेमध्ये सरपटणारे जीवन आहे. या झोपडपट्टीत राहणारी माणसे खेड्यातीलच आहेत. म्हणजेच खेड्यातील लोक त्यांचे आचार, विचार, रीतिरीवाज अशा अनेक प्रकारांचे दर्शन आपणास या कथांतून घडते.

द.ता.भोसले यांच्या कथालेखन वैशिष्टयांविषयी अभिप्राय व्यक्त करताना प्रा.चंद्रकुमार नलगे म्हणतात -

" ग्रामीण माणसाची मानसिक व्यथा, स्त्रियांच्या वाटयाला आलेले दुःखभोग, गावागावात शिरलेले राजकारण, माणसांच्या श्रद्धास्थानांना सुरुंग लावणाऱ्या सुधारणा, तरुण मनातील तरलभाव, ग्रामीण जीवनातील ऋजुता भोसल्यांच्या कथांतून प्राधान्याने प्रत्ययाला येते. दखल घ्यावी अशी विनोदी कथाही त्यांनी लिहिली आहे. लोकविलक्षण व्यक्ती आणि विपरीत प्रसंग, प्रौढांचे जग आणि बालजग यातील विसंगतीतून त्यांची कथा आकार घेते. विनोदाला निकोप रीतीने फुलवण्याची ताकद त्यांच्यात आहे." [२९] त्यांचे हे मत कोणालाही मान्य व्हावे.

वरील सर्व विवेचनावरून आपणास असे म्हणता येईल की, या कथासंग्रहाची भुकेच्या विविध परिमाणाचे चित्रण, शोषणाच्या नाना तऱ्हांचे दर्शन व परिस्थितीशी टक्कर देणाऱ्या वृत्तीचा आविष्कार ही आशयसूत्रे आहेत. तसेच वास्तववादाचे दर्शन घडविणारी व्यक्तिचित्रे, विविध नाती उलगडणारे मनोविश्लेषण, जीवनानुभवातून प्रकट होणारे नाटय, प्रत्ययकारी जीवनदर्शन, ग्रामीण वास्तवाचे कलात्मक चित्रण, अन्वर्थक शीर्षके, कथेस गती देणारे संवाद, काव्यात्म,

आशयास साजेशी भाषाशैली, विविध निवेदन पध्दतीचे उपयोजन, अलंकारवैभव, प्रतीके, फँटसी, डाँटचे कलात्मक उपयोजन, कलात्मक आरंभ शेवट ही वैशिष्टये आहेत. /

योगायोगाचे उपयोजन, वर्णनातील अस्वाभाविकता हे दोष आहेत.

असे असले तरी मूल्याविष्कार व ग्रामीण वास्तवाचे प्रखर दर्शन या गुणवैशिष्टयांमुळे या कथांची गुणवत्ता वाढलेली आहे.

=-=-=-=-=-=-=-=

प्रकरण चौथे - संदर्भ :-


१) द.ता.भोसले,'पाऊस,'पुणे १९८४, पृ.१२८.

२) उनि.पृ.१२८

३) उनि.पृ.१०४

४) उनि.पृ.९७

५) उनि.पृ.४३

६) उनि.पृ.१२६

७) उनि.पृ.९०

८) उनि.पृ.९०

९) उनि.पृ.१०२

१०) वासुदेव मुलाटे,'ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास,'औरंगाबाद, १९९२,पृ.१६९.

११) उनि.पृ.१६९

१२) उनि.पृ.२२६

१३) उनि.पृ.१६९

१४) तत्रैव पृ.१६३

१५) तत्रैव पृ.२२५

१६) तत्रैव पृ.१७०

१७) एस.एम.कानडजे,'विचार भारती,'पुणे, मे जून १९८७,पृ.४८.

१८) तत्रैव पृ.५५-५६

१९) तत्रैव पृ.१४

२०) तत्रैव पृ.५

२१) तत्रैव पृ॰३२

२२) तत्रैव पृ॰९७

२३) तत्रैव पृ॰८२

२४) तत्रैव पृ॰८९-९०

२५) तत्रैव पृ॰१००

२६) तत्रैव पृ॰२६८

२७) तत्रैव पृ॰७३

२८) तत्रैव पृ॰१३९

२९) चंद्रकुमार नलगे,'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास',पुणे,१९९६, पृ॰१०३-१०४॰

=-=-=-=-=